अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

जा.क्र.अम / सका - १६ / २००८.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक : १० -०९ -२००८.

अहमदनगर महानगरपालिकेच्या खास सभेची सुचना.

( मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ - नियम क्र. १ (ह) अन्वये.)
सभा सुचना क्रमांक १६ , दिनांक १५-०९-२००८.

प्रति,
सन्मा.श्री. / श्रीमती.............................................................

सदस्य / सदस्या, प्रभाग क्रमांक
अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

महोदय / महोदया,

यांस-

याद्वारे कळविण्यांत येते की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ - नियम क्र. १ (ह) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची खास सभा सोमवार दिनांक १५-०९-२००८ रोजी दुपारी १-०० वाजता महानगरपालिका सभागृहात सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

सोबत : १. दि.२५-०६-२००८ च्या सभेचे इतिवृत्त.
२. विषयपत्रिका.
३. प्रस्तावाची टिप्पणी.

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

सभा क्रमांक १६ दिनांक १५-०९-२००८ रोजी दु. १.०० वां होणा-या मा.खास सभेची विषय पत्रिका.

-- *--

| विषय क्रमांक | विषय |
|---|---|
| १ | दिनांक २५-०६-२००८ रोजी झालेल्या मा.सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत. |
| २ | दुखवटयाचे प्रस्ताव. |
| ३ | अहमदनगर शहराच्या दुस-या सुधारित मंजुर विकास योजनेत सावेडी स.नं. २३१/१ब , २अ २३२/१ अ व ही बसस्थानक या वापराकरीता दर्शविलेली ३.७९ हेक्टरपैकी १ हेक्टर जागा विकास योजनेत सार्वजनिक - निम सार्वजनिक ( PUBLIK - SEMIPUBLIK ZONE ) विभागात बदल करणेसाठी नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणे बाबत मा.विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,अहमदनगर यांचे दि.०८-०८-०८ रोजीचे पत्र व मा.श्री.अविनाश घुले, सभापती,स्थायी समिती यांची दि.११-०८-२००८ रोजीची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ सादर. |
| ४ | अहमदनगर महानगरपालिकेने तयार केलेल्या नागरिकांचा जाहिरनामा यामध्ये विहीत केलेल्या मुदतीत कार्यालयीन कर्तव्ये पार पाडतांना विलंबास प्रतिबंध होणे बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ सादर. |
| ५ | यश पॅलेस ते कोठी रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरीत करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ सादर. |
| ६ | सन २००८-२००९ मध्ये महानगरपालिकेतील मुलभूत सुविधांच्या विकासासाठी प्राप्त विशेष अनुदानातुन मुलभूत सोयी सुविधा पुरविणे बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ सादर. |
| ७ | नागापुर / बोल्हेगांव या उपनगरांसाठी स्मशानभुमि / दफनभुमि इत्यादी कामासाठी नागापूर स.नं.१३० / १ ही जागा संपादन करणे महानगरपालिका ठराव नं.७ दि. २८-०७-२००८ अन्वये झालेल्या ठरावानुसार प्रस्ताव निर्णयास्तव सादर. |
| ८ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. |

मा.महापौर यांचे मान्यतेने.
दिनांक : १०-०९-२००८.

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : १ दिनांक : १५-०९-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : दिनांक २५-०६-२००८ रोजी झालेल्या मा.सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

--*--

प्रस्तावाचा मजकुर : दिनांक २५-०६-२००८ रोजी झालेल्या मा. सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणेसाठी मा.खास सभेपुढे ठेविले.

--*--

**चर्चा :** या विषयावर चर्चा सुरू असतांना मा.श्री.कृ.द.जाधव आज हिंदी दिन असल्यामुळे व हिंदी ही राष्ट्र भाषा असल्यामुळे हिंदीत कामकाज करावे असे सूचविले.

मा.श्री.दिप चव्हाण - महानगरपालिका क्षेत्रामध्ये सध्या गणेशोत्सव, रमजान उत्सव तसेच नवरात्राचे दिवस आहेत. केअरटेकर यांना जिल्हा निवडणुक कार्यालयाकडे निवडणुककामी पाठविले आलेले आहे. तसेच बरेचसे कर्मचारी जकात विभागाकडे गेलेले असल्यामुळे महानगरपालिकेचे काम ठप्प झालेले आहे, आरोग्याचे प्रश्न निर्माण झालेले आहे. तेंव्हा याकामी काय उपाययोजना करणार आहात ?

मा.श्री.दिपक सुळ - उपमहापौर - बरेचसे कर्मचारी इलेक्शन ड्युटी करीता दिलेले असल्यामुळे कामावर परिणाम झालेला आहे खरे आहे त्याकरीता शासनाकडे पत्रव्यवहार करावा.

यावर मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, मा.जिल्हाधिकारी साहेब यांना याकामी अर्ध शासकीय पत्र (डिओ लेटर) देवून कर्मचारी मुक्त करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

मा.महापौर - केअरटेकर उपलब्ध नसल्यामुळे आरोग्याचे प्रश्न निर्माण झालेले आहेत. सफाई कामे कोणाकडून करावयाची व कोणाकडून करून घ्यावयाची हा ही प्रश्न आहे. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाकडे महानगरपालिकेचे किती कर्मचारी आहेत व कोणाकडे किती कर्मचारी आहेत याबाबत आस्थापना विभागाने माहिती द्यावी.

मा.श्री.दिप चव्हाण - कर्मचा-यांना वर्षा नु वर्षे अशाप्रकारे ड्युट्या दिल्या जातात.

मा.श्री.गिरवले - प्रत्यक्षात किती लोक जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविले आहेत याबाबत आस्थापना विभागासही माहिती नाही.

मा.महापौर - सध्या ३१५ कर्मचारी कमी आहेत. महापालिकेचे काम ठप्प झालेले आहे.

मा.श्री.कृ .द.जाधव - महानगरपालिकेचे पदाधिकारी व अधिकारी यांचेकडे नियमानुसार किती लोक पाहीजे. अधिका-यांकडे ४ / ४ बाया काम करतांत याबाबत सखोल चौकशी करावी. गार्डन विभागाचे श्री.गोयल यांना चौकशीस बाधा न येता कामावर हजर करून घेण्यात आले. परंतु त्यांना मोटार व्हेईकल विभागामध्ये काम देण्यात आले आहे. वास्तविक मोटार व्हेईकलचा आणि त्यांच्या कामाचा संबंध नाही. त्यांना मोटारी मधील काहीच माहिती नाही. त्यांना कसेकाय तिकडे पाठविण्यात आले.

यावर मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, श्री.गोयल यांना त्यांच्यावर ठेवण्यात आलेल्या आरोपाबाबत चौकशीस बाधा न येता कामावर हजर करून घेण्यात आले आहे. मोटार व्हेईकल विभागाचे श्री.कुमार सेवानिवृत्त झाल्यामुळे कामाचे सोयीसाठी सदर विभागात श्री.गोयल यांना नेमण्यात आले आहे.

मा.महापौर - कामाचे सोयीसाठी श्री.गोयल यांना मोटार व्हेईकल विभागात नेमले आहे.
मा.श्री.आगरकर - श्री.गोयल दोषी आढळून आल्याने त्यांच्यावर काय कारवाई केली आहे. यापूर्वी ते कितीवेळ निलंबीत झाले आहेत. एखाद्या गोष्टीमुळे संस्थेचे अहीत किती प्रमाणात होत आहेत. यापूर्वी पर्यावरणाचा खर्च विहीत पध्दतीने केलेला नव्हता. त्यांचेबाबत विभागीय चौकशी लावण्यात आलेली आहे याबाबत लेबर ऑफिसर यांनी खुलासा करावा.
मा.श्री.नामदेव पवार - श्री.गोयल यांना दुसरे कोणते तरी पद देण्यात यावे.
मा.श्री.वाकळे बहिरनाथ - यापूर्वी दि. २५-०६-२००८ च्या सभेमध्ये ८ वी वर्ग चालू करण्याबाबत ठराव मंजुर करण्यात आलेला होता. त्याबाबत काय कारवाई करण्यात आली याबाबत उपायुक्त यांनी खुलासा करावा असे सूचविले असता महानगरपालिका शिक्षण मंडळाचे प्रशासनाधिकारी श्री.गुळवे यांनी खुलासा केला की, याबाबत ठराव नं. ४ दि. २५-०६-२००८ अन्वये मंजुरी दिलेली होती. तथापि याबाबत शासनाकडून महानगरपालिकेला ८ वी चे वर्ग चालू करणेबाबत मंजुरी मिळाली नाही. महानगरपालिका अनधिकृतपणे पुढील वर्ग, शाळा चालविता येणार नाही. शासनाची परवानगी आल्यानंतरच कार्यवाही करता येईल. त्याकरीता आत याला पुढील एक वर्ष मुदतवाढ घ्यावी व पुढील वर्षी परवानगी आल्यानंतर चालू करीता येईल असा प्रस्ताव पाठविला आहे असे सांगितले.
मा.श्री.आगरकर - प्राथमिक शाळा शिक्षण मंडळाला माध्यमिक शाळा चालू करता येतात काय ? हा प्रश्न उपस्थित केला.
याबाबत प्रशासनाधिकारी श्री.गुळवे यांनी परत खुलासा केला.
मा.श्री.कावरे आसाराम - आमुच्या वॉर्डातील महानगरपालिका शाळांना विद्यार्थ्यांना बसण्याकरीता बाकडे माझ्या नगरसेवक विकास निधीमधुन उपलब्ध करून द्यावेत.
मा.श्री.दिप चव्हाण - मागील दि.२५-०६-०८ च्या सभेमध्ये प्रस्ताव क्र.६ मध्ये घनकचरा प्रकल्पा बाबत मा.आयुक्त यांना अधिकार दिलेले होते. त्याबाबत खुलासा करण्यांत यावा. यावर मा.उपायुक्त यांनी खुलासा केला की, ठरावा प्रमाणे कार्यवाही केलेली आहे. व याबाबत चर्चाही झालेली आहे. संबंधित पार्टी याबाबत महानगरपालिका मंजुरी कशी देणांर आहे. यावर काम करण्यांस तयार आहे काय याबाबत विचारणा केलेली आहे. तथापि त्यांचेकडुन अद्यापी उत्तर आलेले नाही. त्यावर मा.श्री.दिप चव्हाण यांनी विचारले की, याबाबत महानगरपालिका मंजुरी कशी देणांर आहे. मा.उपमहापौर श्री.दिपक सुळ यांनी खुलासा केला की, त्यांना मान्य असेल तर करारनामा करू अन्यथा रद्द होईल.
मा.श्री.कृ.द.जाधव - अप्पु चौक सुशोभिकरण मार्गी लागलेले नाही. तसेच इतरही चौकातील दोन ते तीन ठिकाणच्या जागा महत्वाच्या आहेत. महानगरपालिकेने हत्ती आणुन योग्य ठिकाणी बसविलेला नाही. इंजिनिअर यांच्या मताप्रमाणे व्यवस्था करावी. भटके कुत्रे बाबत काय व्यवस्था आहे. बालिकाश्रम रोडवर वर इतर ठिकाणी बरेच भटके कुत्रे आहे. त्याबाबत व्यवस्था करण्यांत यावी. यापुर्वीचा ठेकेदार यांचा उपक्रम बंद पडलेला आहे. यावर मा.श्री.नामदेव पवार यांनी सांगितले की, भटक्या कुत्र्यांवर कारवाई करणेसाठी मनपाने टोल फ्री क्रमांक देण्यांत यावा. यावर मा.श्री.दिपक सुळ यांनी सांगितले की, भटक्या कुत्रे संबंधी पार्टी काम करण्यांस तयार नाही. यावर मा.श्री.गारूडकर यांनी सांगितले की, भटक्यां कुत्र्यांसाठी गावाच्या बाहेर जागा देण्यांत यावी. व टोल फ्री नंबर देण्यांत यावा.
मा.श्री.उडाणशिवे -- मागील सभेमध्ये विषय उपस्थित केला होता की, दलित वस्तीतील समाज मंदिर याचा वापर योग्य रितीने केला जात नाही. व समाज मंदिर प्रत्यक्ष दलित समाजातील लोकांना वापरण्यांस मिळत नाही. यावर उपमहापौर श्री.सुळ यांनी सांगितले की, बांधकाम विभागाने सदरचे

समाज मंदिर ताब्यात घ्यावे. व त्याचा उपयोग महानगरपालिकेच्या माध्यमातुन होईल असे पहावे. त्यावर मा.श्री.उडाणशिवे यांनी सांगितले की, अशाप्रकारे ज्या - ज्या समाजमंदिराच्या जागा असतील त्याबाबत चौकशी करावी. यावर मा.महापौर यांनी पुढील सभेच्या वेळी चौकशी करून अहवाल सादर करणेबाबत सिटी इंजिनिअर यांना आदेश दिले. व पुढील महासभेपुढे माहिती द्यावी असे सांगितले.

मा.सौ.साहनी -- मा.आयुक्त यांनी आमच्या वॉर्डामध्ये व्हिजीट दिली व मुरूम टाकण्यांचे आदेश दिले होते. परंतु अद्यापपर्यंत मुरूम टाकण्यांत आलेला नाही. तेंव्हा उपोषणास बसु काय ? मुरूमासाठी आयुक्तांच्या भेटीचे कारण काय ? याबाबत निर्णय आपण कधी घेणार आहे. यावर मा.महापौर यांनी सांगितले की मुरूम झोन ऑफिसकडे मागणी केल्यास मुरूमाची व्यवस्था त्वरीत केली पाहिजे. अशा सुचना दिल्यात.

-- * --

**ठराव :** ऑफिस रिपोर्ट व सभेमध्ये झालेल्या साधक-बाधक चर्चेनुसार ठरविण्यांत येते की, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पा बाबत करण्यांत आलेल्या करारनाम्यातुन अट क्रमांक २१ च्या अनुषंगाने मा.शासनाकडुन प्राप्त होणारा ( १२ वा / १३ वा वित्तआयोग ) वित्त आयोगाचा निधी अंतर्गत प्राप्त होणारे कोणतेही अनुदान कंत्राटदारास अनुज्ञेय होणार नाही तथापि या व्यतिरिक्त संबंधित कंत्राटदाराने इतर प्राप्त होणारे अनुदान प्राप्त करुन घेतल्यास ते अनुज्ञेय राहील.

ठराव क्रमांक ६ दिनांक २५/०६/२००८ मध्ये अट क्रमांक २२ व २३ रद्द करण्यांत यावी असे नमुद केले आहे. त्या ऐवजी अट क्रमांक २१ च्या अनुषंगाने अट क्रमांक २२ व २३ मध्ये आवश्यक ते गौण फेरबदल करुन घेण्यास ही सभा मान्यता देत आहे.

तसेच करारनाम्यातील अट क्रमांक ६४ मध्ये कराराचा भंग झाल्यास किंवा वाद निर्माण झाल्यास अधिनियमांच्या संविधानातील आवश्यक त्या बदलाच्या अंतर्गत लवाद मा.विभागीय आयुक्त नाशिक मनपा असे नमुद केले आहे. त्याऐवजी सदरचे अधिकार मा.आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका, यांना असतील.

तथापि सर्वश्री.गिरवले कैलास रामभाऊ , डागवाले किशोर आसाराम, सतिष मैड व सौ.अर्चना बिज्जा यांचा " कंपनीस केंद्र व राज्य शासनाकडून या योजने अंतर्गत मिळणारे कोणतेही अनुदान देण्यास आमचा विरोध असुन, आमचा विरोध नोंदविण्यांत यावा. " असे दिलेल्या पत्रानुसार विरोध नोंदविण्यांत येत आहे.

उपरोक्त बदलांसह इतिवृत्त कायम करण्यांस मंजुरी देण्यांत येत आहे.

सुचक : मा.श्री. किशोर डागवाले.

अनुमोदक :मा.श्री. अविनाश घुले.

ठराव बहुमताने मंजुर.

सही /-

महापौर,

अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : २ दिनांक : १५-०९-२००८.

---

प्रस्तावाचा विषय : दुखवटयाचे प्रस्ताव.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ३ दिनांक : १५-०९-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :** अहमदनगर शहराच्या दुस-या सुधारित मंजुर विकास योजनेत सावेडी स.नं. २३१/१ब , २अ २३२/१ अ व ही बसस्थानक या वापराकरीता दर्शविलेली ३.७९ हेक्टरपैकी १ हेक्टर जागा विकास योजनेत सार्वजनिक - निम सार्वजनिक (PUBLIK - SEMIPUBLIK ZONE) विभागात बदल करणेसाठी नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणे बाबत मा.विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,अहमदनगर यांचे दि.०८-०८-०८ रोजीचे पत्र व मा.श्री.अविनाश घुले, सभापती,स्थायी समिती यांची दि.११-०८-२००८ रोजीची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ सादर.

-- * --

**प्रस्तावाचा मजकुर :** अहमदनगर शहराची दुसरी सुधारित विकास योजना शासनाने निर्णय क्र.टीपीएस/१६९९/१६१२/सी.आर.२७ (ब) /०३/यु.डी.-९ दि.४ जुलै २००५ अन्वये मंजुर केली असुन ती दि. २३-०८-२००५ पासुन अंमलात आलेली आहे.

सदर मंजुर विकास योजना आराखडयात सावेडी स.नं. २३१/१ब , २अ २३२/१ अ व २ अ मधील ३.७९ हेक्टर ही जमिन बसस्थानक या वापराकरीता दर्शविलेली आहे. (TRANSPORTATION ZONE) शासनाच्या समाजकल्याण विभागाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनाची इमारत बांधणेसाठी विषयांकित महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या मालकीच्या जागेची जमिन हस्तांतरीत करून विकसित करण्याचा प्रस्ताव आहे. याबाबत सदर जागेची मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर , मा.सहाय्यक संचालक, नगर रचना,अहमदनगर , मा.विभाग नियंत्रक , राज्य परिवहन महामंडळ,अहमदनगर व परिवहन महामंडळाचे अभियंता यांचे समवेत सावेडी स.नं.२३१/१ब, २अ २३२/१ अ व २ अ मधील ३.७९ हेक्टर जमिनीची पाहणी केली व सदर जागेबाबत परिवहन महामंडळाचे अधिकारी यांचे समवेत झालेल्या चर्चेनुसार विकास योजनेत बसस्थानक या वापराकरीता दर्शविलेल्या ३.७९ हेक्टर जमिनी पैकी नगर - मनमाड मार्गा लगत असलेली २.७९ हेक्टर जागा बसस्थानक , कार्यशाळा इत्यादी करीता सोडुन मागील बाजुची १ हेक्टर इतकी जागा (१२.०० मी.रूंदीच्या रस्त्यांसह ) डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवना करीता देणे बाबत सर्व अधिकारी वर्गाचे एकमत झालेले आहे. परंतु सदर जमिन विकास योजनेत बस स्थानक वापरा करीता दर्शविलेली असल्याने सदर वापर बदलणे बाबतची कार्यवाही महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये करणे आवश्यक आहे.

तरी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या मालकीची सावेडी स.नं.२३१/१ब, २अ २३२/१ अ व २ अ मधील ३.७९ हेक्टर क्षेत्र असलेली बसस्थानक या (TRANSPORTATION ZONE) वापरा करीता दर्शविलेल्या जागे पैकी (सदर जागे बाबतचा परिवहन महामंडळाने दिलेला नकाशा सोबत जोडलेला आहे.) मागील बाजुची १ हेक्टर जागा (१२.०० मी.रूंदीच्या रस्त्यांसह ) विकास योजनेत सार्वजनिक - निम सार्वजनिक विभागात (PUBLIK - SEMIPUBLIK ZONE ) बदल करणेसाठी व तसेच या जागेत जाणे - येणेसाठी १२.०० मी रूंद विकास योजना रस्ता प्रस्तावित करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणे बाबतचा प्रस्ताव मा.शासनाकडे मंजुरीकरीता पाठवावा लागेल. या करीता सदरचा प्रस्ताव प्राथमिक मंजुरीसाठी मा.महासभेपुढे सादर करणे योग्य होईल. आदेशार्थ सादर.

सोबत : १. विकास योजनेचा उपरोक्त फेरबदल दर्शविणारा भाग नकाशा
२. राज्य परिवहन मंडळाचा नकाशा
३. व सहपत्रे.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, " अ " प्रस्तावित नुसार सदरची बाब ही धोरणात्मक स्वरूपाची असलेकारणांने मा.महासभेसमोर एम.आर.टी.पी.ॲक्ट १९६६ चे कलम ३७ नुसार प्राथमिक मंजुरीस्तव निर्णयास्तव सादर करणे योग्य.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, प्रस्ताव महासभेवर सादर करावा.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, महासभेपुढे सादर करावा.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त (कर) , मा.आयुक्त साहेब , मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयार्थ मा.खाससभेपुढे ठेविला.

--*--

**चर्चा :** सदरचा विषय दु.३ वा.चर्चेला आला. विषय वाचून दाखविण्यांत आला. त्यावर खालील प्रमाणे चर्चा झाली.

मा.श्री.कानडे : सदरचा विषय मा.श्री.अविनाशजी घुले, सभापती यांनी पत्र देवुन मांडलेला आहे. तथापि सदरचा विषय मंजुर करण्यां बाबत सुचविले.

मा.श्री.वाकळे : सदरचा विषय सामाजिक न्याय भवन, बांधण्याबाबत सुचविलेला आहे. त्याचा न्यायप्रक्रियेशी संबंध नाही. सदर ठिकाणी सगळे विभाग एकत्रित येणांर आहेत.

मा.श्री.अविनाश घुले : याबाबत शासन निर्णय झालेला आहे. व धोरणात्मक बाब असल्यामुळे महासभेपुढे सदर विषय आलेला आहे.

मा.श्री.सुळ : न्याय प्रविष्ट झालेला असतांना चर्चा करणे इष्ट नाही.

मा.श्री.नामदेव पवार : सदर जागा वापरा बाबतचा झोन बदलणे आवश्यक आहे.

--*--

**ठराव :** ऑफिस रिपोर्टात नमुद केल्यानुसार नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. सदर प्रस्ताव मंजुरीसाठी मा.शासनाकडे पाठविणेत यावा. नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.अविनाश घुले.

अनुमोदक : मा.श्री.अशोक कानडे.

ठराव सर्वानमुते मंजुर.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ४ दिनांक : १५-०९-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :** अहमदनगर महानगरपालिकेने तयार केलेल्या नागरिकांचा जाहिरनामा यामध्ये विहीत केलेल्या मुदतीत कार्यालयीन कर्तव्ये पार पाडतांना विलंबास प्रतिबंध होणे बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ सादर.

-- * --

**प्रस्तावाचा मजकुर :** शासनाने दि.१२ मे ०६ पासुन कार्यालयीन कर्तव्ये पार पाडतांना होणा-या विलंबाबात प्रतिबंध करणे संबंधीचा अधिनियम तयार केला असुन त्या नियमातील कलम ८ नुसार यापुर्वीच अहमदनगर महानगरपालिकेने नागरिकांचा जाहिरनामा (सनद ) प्रसिध्द केली आहे. त्यामध्ये कार्यालयीन अधिकारी / कर्मचारी यांचेकडे प्रलंबित असलेल्या फाईलचा निपटारा करणेसाठी विहीत मुदत नागरिकांच्या जाहिरनाम्यात नमुद करण्यांत आलेली आहे. विहीत मुदतीत काम न करणा-या अधिकारी / कर्मचारी यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ५६ (२) (३) नुसार विलंबाबाबत प्रतिदिवशी रू.२५ /- (रू.पंचवीस मात्र ) विलंबाचा दंड आकारणीचे अधिकार संबंधित विभागाचे विभागीय अधिकारी उपायुक्त व सहाय्यक आयुक्त यांना राहील. तसेच नागरिकांच्या जाहिरनामामधील पान क्र. ५ नगर रचना विभागाचा १ चा (क) मध्ये भोगवटा वापर प्रमाणपत्रासाठी खालील प्रमाणे शुल्क आकारणीस मान्यता देणे योग्य होईल.

३०० चौ.मि.पर्यंत रू. ५०० /-

३०० ते ४५० पर्यंत रू. ७५० /-

४५० ते १००० पर्यंत रू. १००० /-

१००० च्या पुढे रू. ३०००/-

व्यावसायिक उपयोगासाठी वरील दाराच्या दुप्पट राहतील.

बांधकाम परवानगी तातडीने हवी असल्यास महानगरपालिकेत " अतिजलद सेवा " Fast Track System सुरू करून त्यासाठी खालील प्रमाणे आकारणी ठेवणे योग्य.

१५० चौ.मि.पर्यंतच्या परवानगीस छाननी फी रू. ५००/-

१५१ च्या वर ३०० चौ.मि. १००० /-

३०१ ते ५०० रू. २००० /-

५०१ च्यावर ३००० /-

वाणिज्य / औद्योगिक वापरास वरील दराच्या दुप्पट दराने आकारणी करण्यात येईल. अतिजलद सेवेअंतर्गत ५ दिवसात बांधकाम परवानगी देण्यात येईल.

याबाबत महासभे समोर नागरिकांचा जाहिरनामा व संबंधित अधिकारी कर्मचारी यांनी विहित मुदतीत कार्यवाही न केल्यास दर दिवशी दंड आकारणी बाबत तसेच महानगरपालिकेच्या नगर रचना विभागातील बांधकाम परवानगी मध्ये " अतिजलद सेवा " " Fast Track System " सुरू करून प्रस्तावाप्रमाणे शुल्क आकारणी करणे बाबत मंजुरीस्तव प्रस्ताव सादर करण्यांत येत आहे.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, " अ " नुसार मा.महासभेसमोर ठेवणेस हरकत नाही.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, महासभेपुढे ठेवणे.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त (कर) व मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयार्थ मा.महासभेपुढे ठेविला.

--*--

**चर्चा :** नागरिकांचा जाहिरनामा मंजुरीसाठी. सदरचा विषय दु.३ वाचुन १० मिनिटांनी चर्चेला आला.सदरचा ऑफिस रिपोर्ट वाचुन दाखविण्यांत आला त्यावर खालील प्रमाणे चर्चा झाली.

मा.श्री.वाकळे : नागरिकांचा जाहिरनामा केंव्हा प्रसिध्द केला याची माहिती नाही.

मा.उपायुक्त : यांनी खुलासा केला केला की नागरिकांचा जाहिरनामा यापुर्वीच प्रसिध्द केला आहे. व त्याच्या प्रती सर्वांना पाठविलेल्या आहेत. यावर मा.श्री.दिप चव्हाण यांनी सांगितले की जाहिरनाम्याची प्रत द्यावी. त्यावर उपायुक्त यांनी सांगितले की, नागरिकांचा जाहिरनामा जुनाच आहे. त्यामध्ये काही नविन सुधारणा करण्यांकरीता जाहिरनाम्याच्या प्रती सोबत पाठविलेल्या आहेत. व मंजुरी नुसार सुधारणा केल्या जातील असे सांगितले.

मा.श्री.कानडे : नागरिकांच्या जाहिरनाम्याप्रमाणे विहीत मुदतीत निपटारा न करणां-या कर्मचा-यांना विलंबाबाबत प्रति दिवशी रू.२५ /- दंड आकारणे बाबत सुचविलेले आहे. ही दंडाची आकारणी वाढविणे आवश्यक आहे. जेणेकरून कामकाजामध्ये सुधारणा होवुन कामांस गती येवु शकेल. याकरीता सदर दंडाची आकारणी रू.५० /- करणे बाबत सुचविले.

मा.श्री.नामदेव पवार : गुंठेवारी कायद्यानुसारही विलंबा बाबत दंडाची तरतुद करण्यांत यावी.

मा.श्री.फुलसौंदर : गुंठेवारी बाबत महिन्यातुन एकदा कँप घ्यावा. त्यानंतर अशाबाबत २ ऑक्टोंबर २००८ रोजी गुंठेवारी बाबतचा कँप घेण्यांबाबत मा.आयुक्त साहेब यांनी सुचना दिली.

मा.श्री.कानडे : स.नं.८२ मध्ये ग्रूप रौ-हौसिंग स्कीम झालेली आहे. सदर ठिकाणच्या बिल्डरने बांधकामाची परवानगी मागितलेली नाही. या ठिकाणी लोक रहावयास आलेले आहे. व एकुण स्कीम ४ हजार घरांची होणांर आहे. त्यामुळे महानगरपालिकेचे या ठिकाणाबाबतचे नुकसान होणार आहे. तरी नविन प्लॅन तपासुन घ्यावा. यावर मा.आयुक्त यांनी या ठिकाणी समक्ष जावुन पाहणी करण्यांत येईल व उचित कार्यवाही करण्यांत येईल अशा सुचना दिल्या.

मा.श्री.आगरकर : बांधकाम परवानगी देतांना बांधकामाच्या प्लींथपर्यंतच परवानगी देणे आवश्यक आहे. तसेच बांधकाम परवानी देण्यांचा कालावधी ३० दिवसांचा करण्यांत यावा. व टप्प्याटप्प्यानुसार बांधकाम परवानगी दिली पाहिजे.सँक्शन प्लॅनप्रमाणे कामे होतील. त्यात काही सुसूत्रता असावी. व परवानगीचा कालावधी ६० दिवसाऐवजी ३० दिवसांचा करावा.

मा.श्री.कानडे : परवानगी कालावधी ३० दिवसांचा करता येवु शकतो काय ?

मा.श्री.फुलसौंदर : पॅनलवर इंजिनिअर घेवुन बांधकाम परवानगी व तदनुषंगिक कामे करणे शक्य आहे. मा.महापौर यांनी सुचविले की, ३० दिवसाचा कालावधी करण्यांस काय हरकत आहे.

मा.श्री.आगरकर : पुर्णत्वाचा दाखला १५ दिवसात मुदतीत देण्यांत यावा. व कंम्प्लीशन बाबत आरोग्य अधिकारी यांचा दाखला ७ दिवसात घेण्यांत यावा.

चर्चेमध्ये डी.पी.प्लॅन क्र.५ व ६ चे काम बंद करण्यांत यावे अशाबाबत सुचविण्यांत आले. तसेच डी.पी.युनिटही बंद करण्यांत यावे.

नविन नळ कनेक्शनची मुदत ३० दिवस ऐवजी १५ दिवस करण्यांत यावी.

बांधकाम परवानगी दिल्यानंतर नागरिक रौ-हौसिंग किंवा फ्लॅटस विकत घेतात. त्याबाबतचे परवानगी बाबतचे जाहिर प्रकटन प्रसिध्द करण्यांत यावे.

-- * --

**ठराव :** ऑफिस रिपोर्ट मंजुर. मात्र सभागृहामध्ये झालेल्या व्यापक चर्चेचा विचार करता सन्माननीय सदस्य यांनी सुचित केलेल्या सुचनांचे समावेशासह प्रस्तावित नागरिकांचा सुधारित जाहिरनामा मसुदा मंजुर करण्यांत येत आहे. सदरच्या सुचना खालील प्रमाणे.

१. गुंठेवारी कायद्यानुसार नागरिकांच्या प्रकरणांचा निपटारा करणेंत यावा. त्यात होणांरा विलंब टाळावा. प्रकरणांत मोजणी नकाशा उपलब्ध नसल्यास नगर रचना विभागामार्फत मोजणी / आखणी करावी / तपासावी.

२. बांधकाम परवानगी देण्यांसाठी कायद्याप्रमाणे ६० दिवसांची मुदत आहे. तथापि ही मंजुरी ३० दिवस करणेंत यावी.

३. बांधकाम पुर्णत्वाचा दाखला देण्यांसाठी सुधारित मुदत २१ दिवस ठरविणेंत यावी.

४.	आरोग्यदृष्टया बांधकाम ना हरकत प्रमाणपत्र ७ दिवसामध्ये देण्यांत यावे.

अशा सुचनांच्या समावेशासह नागरिकांचा जाहिरनामा मसुद्या तयार करण्यांत यावा. तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार नगर रचना योजना क्र.५ व ६ तयार करण्यासाठी फार मोठा कालावधी उलटुन गेलेला आहे. व आता त्यानंतरही मोठा कालावधी लागणांर आहे. मध्यंतरीच्या काळात या भागात संपुर्ण विकास झालेला आहे. त्यामुळे नगर रचना योजना निरूपयोगी ठरणार आहे. सबब नगर रचना योजना क्र. ५ व ६ रद्य करणेत यावी . त्याप्रमाणे आवश्यक ते शासनास कळवावे. तसेच विकास योजना, अहमदनगर (वाढीव क्षेत्र) तयार करण्याचे काम पुर्ण झालेले असल्याने त्यासाठी निर्माण केलेला विकास योजना विशेष घटक बंद करणेत यावा.

सुचक : मा.श्री.नामदेव पवार.
अनुमोदक : मा.श्री.भगवान फुलसौंदर
ठराव बहुमताने मंजुर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ५ दिनांक : १५-०९-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : यश पॅलेस ते कोठी रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरीत करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ सादर.

--*--

प्रस्तावाचा मजकुर : यश पॅलेस ते कोठी रस्ता आजमितीस महानगरपालिकेच्या ताब्यात आहे. या रस्त्याची एकुण लांबी २ कि.मी.आहे व आराखडयानुसार रूंदी १८.२८ मीटर आहे. सदर रस्त्याची चौपदरीकरण करण्यांचे काम महानगरपालिकेने हाती घेतले होते. (महासभा ठराव क्र.७ दि.१८-१२-२००७ ) त्याकामी मे.श्रीखंडे कन्सल्टंट प्रा.लि.नवि मुंबई यांची सल्लागार म्हणुन नियुक्ती करण्यात आली होती. ( महासभा ठराव क्र.९ दि.२६-१०-२००७ ) दिनांक १८-१२-२००७ ठरावामध्ये सदर काम महापालिकेचा निधी अथवा शासनाचे अनुदान अथवा कर्ज स्वरूपात उभारून काम करण्याचे नमुद केले आहे. त्या अनुषंगाने सल्लागार यांनी रस्त्याचे सर्व्हेक्षण करून रू.९,२०,७१,००० /- रक्कमेचे सविस्तर अंदाजपत्रक तयार केले आहे. शासनाचे अनुदान मिळणेकामी मा.शासनास नगरविकास विभागास पत्र क्र.४३८७ दि.३१-०३-२००८ अन्वये रूपये ६०.०० कोटीचा प्रस्ताव सादर केलेला आहे. तसेच याकामी रूपये २५.०० कोटी कर्ज उभारणेसाठी शासनाचे परवानगी मिळावी यासाठी पत्र क्र. ४३७४ दि.२७-०३-२००८ अन्वये प्रस्ताव सादर केला आहे. निधीच्या तीनही पर्यायापैकी ( महानगरपालिका फंड, शासन अनुदान व कर्ज ) एकाही पर्यायाद्वारे निधी उपलब्ध अद्याप झालेला नाही. त्यामुळे अंदाजपत्रक तयार होवुनही पुढील कोणतीही कार्यवाही करण्यांत आली नाही.

सद्यस्थितीत सार्वजनिक बांधकाम विभाग,अहमदनगर यांचेमार्फत अहमदनगर ते शिरूर या रस्त्याचे चौपदरीकरणाचे काम प्रगतीत आहे. या मंजुर कामांतुन डी.एस.पी.चौक ते शिरूर अशा लांबीचे चौपदरीकरण तसेच एस.टी.स्टँण्ड जवळ उड्डाणपुल बांधण्याच्या कामांचा समावेश आहे. आजमितीस एस.टी.स्टँण्ड , इंम्पीरियल चौक येथे मोठया प्रमाणात वाहतुक वर्दळ असल्याने अवजड वाहने कोठी ते यश पॅलेस या मार्गाने सोडण्यात येत आहेत. तसेच मार्केट कमिटीमध्ये येणारी अवजड वाहनेही याच मार्गाने मार्केट कमिटीत जातात. अशा प्रकारे वाहतुक वळविल्याने मार्केट कमिटी गेट, एस.टी.स्टँण्ड , इंम्पिरियल चौक येथील वाहतुक कोंडी कमी होण्यांस मदत होत आहे. तसेच अहमदनगर शहराबाहेरून बाहय वळण रस्त्याचे काम चालु आहे. त्यामुळे शहरातील अवजड वाहतुक कमी होईल व उड्डाणपुलाची आवश्यकता राहणार नाही. अशाप्रकारची मागणी / विचार सार्वजनिक बांधकाम खात्यात असल्याचे समजते. अशाप्रकारची मागणी मा.मंत्री सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे काही लोक प्रतिनिधींनी केल्याचे समजते.

तसेच एस.टी.स्टँण्ड , मार्केट कमिटी गेट, इंम्पिरियल हॉटेल चौक या भागातील रस्ता हा राष्ट्रीय महामार्ग क्र. २२२ चा भाग झाला आहे. उपरोक्त वस्तुस्थितीचे अनुषंगाने यश पॅलेस ते कोठी हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरीत झाल्यास त्यांचेकडे प्रगतीत असलेल्या मंजुर कामांतुन त्याचे चौपदरीकरण होईल असे वाटते. त्यांचेकडे हस्तांतरण झाल्यास महानगरपालिकेला उपरोक्त रू. ९,२०,७१,००० /- खर्च करावा लागणार नाही. सार्वजनिक बांधकाम विभागास मंजुर कामांतुन काम करणे शक्य असेल. कोठी ते एस.टी.स्टँण्ड ते यश पॅलेस या रस्त्यावरील वाहतुक वर्दळ कमी होईल. त्यामुळे सदर रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरण करणेस हरकत नाही असे वाटते.

प्रस्ताव अवलोकनार्थ व मा.महासभेच्या निर्णयास्तव सादर.

यावर कार्यकारी अभियंता यांचा अभिप्राय की, अहवालाप्रमाणे अवलोकनार्थ तथा निर्णयार्थ सादर.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की, " अ " मान्यतेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, मा.महासभेसमोर निर्णयार्थ सादर करणे योग्य.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, महासभेपुढे ठेवा.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट कार्यकारी अभियंता , मुख्यलेखाधिकारी , मा.उपायुक्त (कर) व मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.खास सभेपुढे ठेविला.

--*--

**चर्चा -** सदरचा विषय दुपारी ४.५० वाजता चर्चेला आला व खालील प्रमाणे चर्चा झाली.

मा.श्री.त्रिपाठी : सदरचा विषय शहर अभियंता यांनी चुकीच्या पध्दतीने पाठविलेला आहे. वॉर्ड नं.५,६, व ९ इ.प्रभागातील नगरसेवकांची एकानेही मागणी केलेली नाही. असे असतांना हा प्रस्ताव सादर झालेला आहे. याचा गांभीर्याने विचार करावा. सदरच्या रस्त्यावर आनंद ऋषी हॉस्पीटल नंतर आनंद ऋषीजी यांचे राष्ट्रीय समाधीस्थळ तसेच नागरी वस्ती आहे. मनपाने सदरचा रस्ता शासनाकडे वर्ग केल्यास २५ हजार नागरिकांचा रोष महानगरपालिकेला पत्करावा लागेल. हा रस्ता वर्ग केल्यास या रस्त्यावरील सर्व बांधकामे व इतर परवानगी घ्यावयाची झाल्यास शासनाकडुन घ्यावी लागेल. तसेच रस्ते दुरूस्तीही त्यांचे मार्फतच करावी लागेल. सक्कर चौक ते इंपिरियल चौकापर्यंत व पुढे उड्डाण पुल होणांरच आहे. त्यामुळे या रस्त्याची आवश्यकता नाही. नागरिकांची या रस्त्यामुळे मोठया प्रमाणात गैरसोय होणार आहे. त्यामुळे सदरचा रस्ता सार्व.बांधकाम खात्याकडे वर्ग करू नये. त्यास माझा विरोध नोंदविण्यांत यावा.

मा.सौ.भागानगरे : सदर रस्त्यावर मोठया प्रमाणात नागरी वस्ती व घरे आहेत. विविध हॉस्पीटल आहेत. शाळा मार्केट , मंगल कार्यालय इ. असल्यामुळे सदर रस्त्यावर जड वाहतुकीमुळे वाहनांची वर्दळ वाढुन मोठे अपघात होण्यांची शक्यता आहे. त्यामुळे सदरचा गांभिर्याने विचार करून सदरचा यश पॅलेस ते कोठी हा रस्ता शासनाकडे कोणत्याही प्रकारे वर्ग करू नये व राज्य मार्ग करू नये असे सांगितले.

मा.श्री.फुलसौंदर - यश पॅलेस ते कोठी या रस्त्यावर ४-५ हॉस्पीटल तसेच आनंद ऋषीजी हे मोठे हॉस्पीटल,मार्केट यार्ड, आय.टी.आय., बरीच मंगल कार्यालये , सारसनगर , माणिकनगर, इत्यादी नागरी वसाहती आहेत. तसेच कोठी विभागात सर्व सामान्य नागरीक यांची वसाहत आहे. या रस्त्याची रूंदी ३० मीटर अशी आहे. या रस्त्याची मागणी पी.डब्ल्यु.डी.ने केलेली आहे काय ? हायवे स्टँण्डर्डचा हा रस्ता आहे काय ? या रस्त्याचा फायदा नगर शहराला राहणांर नाही. व त्यामुळे नागरिकांचे नुकसान होईल. या रस्त्यावर सध्या अस्तित्वात असलेली बांधकामे अतिक्रमण म्हणुन घोषित करणार काय ? व याचा विचार आपण करणांर आहात काय ? या भागातील काही सर्वसामान्य नागरिकांचे उत्पन्न एक ते दिड हजाराचे आसपास आहे. रिंग रोडचा आग्रह धरल्यास या रस्त्याची जरूरी भासणार नाही. हा रस्ता हाय-वे म्हणुन वर्ग केल्यास या रस्त्यावरील वाहतुक मोठया प्रमाणांत वाढल्यामुळे अपघाताची जास्त शक्यता आहे. तरी भविष्याचा वेध घेवुन सदरचा रस्ता महानगरपालिकेने करावा. सभागृहाला विनंती करतो की, सदर रस्त्याचे हाय-वे स्टँण्डर्ड नसल्यामुळे सदरचा रस्ता राज्य मार्ग करू नये अशी मी मागणी करतो.

मा.श्री.साठे - यश पॅलेस ते कोठी हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करू नये अशी मी भारतीय जनता पक्ष व शिवसेना या दोन्ही पक्षाच्या वतीने मागणी करीत आहे. व यास माझा विरोध नोंदवावा.

मा.श्री.अनिल शिंदे - सदर रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करू नये या रस्त्यावर मोठया प्रमाणात नागरी वसाहत , जैन स्थानक, वस्तीगृह आहे. देशातुन आणि परदेशातुन या ठिकाणी भाविक येत असतात. जड वाहनांच्या वाहतुकीमुळे या रस्त्यावरील प्रदुषण वाढणार आहे. सदर भागातील ब-याचशा नागरिकांचा विरोध असल्यामुळे सदरचा रस्ता वर्ग करू नये असा माझा भाजपा - शिवसेना यांचेवतीने विरोध नोंदवावा.

मा.श्री.संजय चोपडा - यश पॅलेस ते कोठी या रस्त्यावर ५ - ६ मंगल कार्यालय आहे. तसेच बरीच हॉस्पीटल्स, चर्च, तसेच जैन मंदिर हे हजारो जैन लोकांचे आदरस्थान आहे. देशातुन आणि परदेशातुन या ठिकाणी लाखो नागरिक येत असतात. सदरचा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग केला तर सदर विभागातील वातावरण प्रदुषित व खराब होईल. व मोठया प्रमाणावर गर्दी वाढुन दुचाकी वाहन सुध्दा चालविता येणार नाही. अपघाताचे प्रमाण वाढेल व महानगरपालिकेचा या रस्त्यावर हक्क राहणार नाही. तरी सदरचा रस्ता हा सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यांत येवु नये असा विरोध नोंदवावा.

मा.श्री.आगरकर - यश पॅलेस ते कोठी हा रस्ता हस्तांतर करणेंबाबतचा रिपोर्टावरील भुमिका ही सार्वजनिक बांधकाम विभागाची आहे. की महानगरपालिकेची आहे याबाबत कुठल्याही प्रकारची स्पष्टोक्ती नाही.सार्वजनिक बांधकाम विभागाने याबाबत मागणी केलेली नाही. सदर रस्ता नविन तयार करणेबाबत महानगरपालिकेने श्रीखंडे कन्स्ल्टंट यांची नेमणुक केलेली होती. व महानगरपालिकेने सदर रस्त्याचे काम प्रस्तावित केलेले होते. तथापि महानगरपालिकेला याकरीता फंड किंवा अनुदान उपलब्ध झालेले नाही. आजच्या सर्वसाधारण सभेपुढील विषय क्रमांक ६ मध्ये मुलभुत सुविधा पुरविण्यांसाठी ४ कोटी ४८ लाख इ.कामाचे प्रस्ताव सादर करण्यांत आलेले आहेत. असे असतांना सदर रस्त्यासाठी फंड किंवा अनुदान उपलब्ध नाही. हे आपण कसे म्हणु शकातो हे समजु शकत नाही. सदर रस्त्याबाबत नागरिकांच्या भावना तीव्र स्वरूपाच्या आहेत. त्यामुळे सदरचा रस्ता मनपा मार्फत झाला पाहिजे. सदर रस्त्यावर धार्मिक स्थळे असल्यांने त्या दृष्टीने रस्त्याचे महत्व आहे. राज्य महामार्गाचे नॉर्म्स पुर्ण होत नाही. महानगरपालिकेचे इंजिनिअर यांनी हा रिपोर्ट सादर केलेला आहे. सिटी इंजिनिअर महानगरपालिका यांचेकडुन अपेक्षा करतो की, विषय सादर होतांना स्पष्ट मत नोंदविले पाहिजे. या रस्त्याकरीता फंड नाही हे कारण अयोग्य आहे. मनपा टप्प्याटप्प्याने हा रस्ता करू शकते. विकासाच्या प्रश्नावर आम्ही जरूर सहकार्य करू सक्कर चौका पासुन उड्डाण पुलाची ख-या अर्थाने आवश्यकता आहे. व उड्डाणपूल होणे ही काळाची गरज आहे. तथापि याबाबतीत काही तरी राजकीय वास असल्याचे दिसुन येते. उड्डाणपूला संदर्भामध्ये महानगरपालिकेची काय भुमिका आहे , १०० % उड्डाणपूल झालाच पाहिजे. अशा रितीने मनपाची मागणी झाली पाहिजे. याबाबत कोणत्या लोकप्रतिनिधीने रस्त्याची मागणी केलेली आहे त्यांचे नांव यामध्ये दिसुन येत नाही. पुलाचे अनन्य साधारण महत्व आहे. तरी सदरच्या रस्ता हस्तांतरणांस आमचा विरोध नोंदवावा.

मा.श्री.गिरवले - यश पॅलेस ते कोठी रस्त्याबाबत चर्चा चालू आहे. सदर रस्त्याबाबत जर विचार केला तर नगर शहराच्या दृष्टीने हा नव्यांने रस्ता तयार होणार आहे. सार्वजनिक बांधकाम खात्यालाही रस्त्या बाबत मोठया अडचणी येतात व त्यांच्या कामांचा अनुभवही वाईट प्रमाणांत आहे. यापुर्वी नागरिकांच्या मागणीवरून बांधकाम विभागाचे रस्ते आपण मनपाकडुन हस्तांतरीत करून घेतलेले आहे. मग हाच रस्ता बांधकाम विभागाकडे हस्तांतरीत करावयाचे कारण काय ? या रस्त्यावरील बराचसा भाग हा निवासी भाग झालेला आहे. हा रस्ता हस्तांतरीत केल्यास मनपा

त्यावर काहीच करू शकणांर नाही. व बांधकाम विभागही रस्त्याची व्यवस्थित देखभाल करू शकणांर नाही. मनपा मार्फत रस्ता करण्यांकरीता कर्ज उपलब्ध करून घ्यावे. रस्ता ट्रान्स्फर करण्यांचे काही कारण नाही.

मा.श्री.नामदेव पवार - सदरच्या रस्त्याबाबत जो प्रस्ताव मनपाने दिलेला आहे त्यामध्ये बाहय वळण रस्त्याचे कामामध्ये व उड्डाण पुलाची आवश्यकता राहणार नाही. हे मत कोणाचे आहे याबाबत सिटी इंजिनिअर यांनी खुलासा करावा असे सुचविले. नविन हाय-वे मुळे उड्डाणपूल रद्द होत नाही. यापुर्वीचा ६० फुटी रस्ता तसाच ठेवावा. कारण बांधकाम विभाग करणांर नाही. पी.डब्ल्यु.डी.कडे रस्ता हस्तांतरीत न करता मनपाने करावा.

मा.श्री.कृ.द.जाधव - सदरचा प्रस्तावाचा विषय हा चुकीच्या पध्दतीने दिलेला आहे. उड्डाण पूल होणांर किंवा होणांर नाही हा गोंधळ निर्माण झालेला आहे. रस्ता हस्तांतर करतांना महानगरपालिकेने अटीयुक्त ठराव करून रस्त्यावरील नागरिकांना कोणताही त्रास होणांर नाही. अशारितीने हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरीत करण्यांस हरकत नाही.

मा.श्री.कावरे - चांगले रस्ते व्हावे ही मनपाची इच्छा आहे. व त्याबाबत मी महापौरांना विनंती करतो.

मा.महापौर - उपरोक्त चर्चेवर महापौर यांनी खुलासा केला की, गेल्या दोन तीन दिवसांमध्ये स्थानिक वृत्तपत्रांमध्ये सदरच्या रस्त्याबाबत काही वृत्त छापून आलेले आहे. मनपाच्या वतीने सहा रस्ते करण्यांबाबतचा विषय घेत असतांना श्रीखंडे कंन्स्ल्टंट यांची नियुक्ती केलेली होती. व प्रमुख दोन रस्त्यांचे एस्टीमेंट पाहता सदर रस्त्यांवरील ९ कोटीचे अंदाजपत्रकावर मनपा खर्च करू शकणांर नाही. सदर रस्त्यावरील यापुर्वी असणा-या ॲक्टिव्हिटी एकेक करून सोडविलेल्या आहेत. व ड्रेनेजची अडचण होती ती दूर केलेली आहे. व महत्वाचे काम पुर्ण केलेले आहे. तसेच या रस्त्यालगतचा जोडणांरा इतर भाग यावरही १ कोटी ४७ लाख खर्च करून रस्ते व्यवस्थित केलेले आहे. या रस्त्यावर उड्डाणपूल रद्य होणार नाही याबाबत आम्ही प्रयत्न केलेले नव्हते.

आज डी.एस.पी.चौक ते केडगांव पर्यंत जाण्यांस वाहतुकीला दीड ते दोन तासाचा वेळ लागत आहे. नियोजित रस्त्यावर ९ कोटीचा खर्च आपण करू शकणांर नाही. त्यामुळे सदरचा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यांस काय हरकत आहे. रिंग रोड व उड्डाणपूल होणारच आहे याबाबत आम्ही मा.ना.छगनरावजी भुजबळ यांची भेट घेतली आहे. नविन रस्त्यावरील नॉर्म्स हे मनपा , नगर रचना कायद्याप्रमाणेच आहे. व त्याचप्रमाणे बांधकाम परवानगी मिळणांर आहे.

सदर रस्त्याकामी फक्त अर्बन बँकच कर्ज देवु शकते इतर बँका कर्ज देवु शकत नाही अशी माहिती मनपाला मिळालेली आहे.

शहरामधील नागरिकांना या नविन रस्त्यावर टोल भरण्याची आवश्यकता राहणार नाही. व उड्डाणपूल होणारच आहे. व त्याकरीता मी आपणांसर्वांबरोबरच आहे. उड्डाण पूलासह बायपास रस्ता होणार आहे तर काय हरकत आहे. सार्वजनिक बांधकाम खात्याकडून हा रस्ता साडे नउ कोटीचा बी.ओ.टी.तत्वावर होणांर असल्याने व त्याबाबतचा मेंटेंनन्स करण्यांची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम खात्यावरच असणार आहे.

नेप्ती गेट ते पत्रकार चौक या रस्त्याचे एस्टीमेंट आता सात ते साडेसात कोटीचे झालेले आहे. त्याबाबतही मंजुरी द्यावी. तसेच पाईपलाईन रोडचे अंदाजपत्रक महानगरपालिकेमार्फत उपलब्ध तरतुदीचे अनुषंगाने करण्यांत यावे.

यानंतर सभागृहामध्ये सर्व सदस्यांनी एकाच वेळी बोलण्यांचा प्रयत्न केल्यामुळे सभागृहामध्ये गोंधळा झाला व सायंकाळी ६-०५ वा. मा.श्री.आगरकर, मा.श्री.फुलसौंदर,मा.श्री.दातरंगे, मा.श्री.चोपडा, मा.श्री.शिंदे , मा.श्री.साठे इ.यांनी आमचा या रस्त्यासाठी विरोध असल्यामुळे आम्ही सभात्याग करीत आहोत असे सांगुन सभात्याग केला.

तदनंतर विषय क्रमांक ६,७ व ८ बहुमताने मंजुर होवुन सभेचे कामकाज सायं.६-४५वा.संपल्याचे मा.महापौर साहेब यांनी घोषित करून सभा समाप्त झाली.

---*---

ठराव : **अ)** ऑफिस रिपोर्ट व मा.सभागृहात झालेली चर्चा यानुसार ठरविण्यांत येते की, सदर यश पॅलेस ते कोठी रस्ता सुधारणा करणेसाठी सार्व.बांधकाम विभागाकडे हस्तांतरीत करण्यांस तसेच रस्ता हस्तांतरीत झाल्यानंतर इमारती बांधकामाचे आज रोजी अस्तित्वात असलेले सर्व नियम लागु राहतील. या अटीसह मान्यता देण्यांत येत आहे. मात्र मा.शासनाने इंम्पिरिअल चौक ते कोठी रस्ता या दरम्यान उड्डाणपुल बांधण्याचे नियोजीत आहे. ते देखील काम लवकरात लवकर मा.शासनाने हाती घेणेत यावे.

मात्र यश पॅलेस ते कोठी रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरीत करणेत आल्या नंतर संबंधितांकडून सदरच्या प्रक्रीयेस विलंब दिसत असल्यास नागरी सुविधा देणे बाब सर्वोच्च असलेने महानगरपालिकेने सदरचा रस्ता करणे बाबत योग्य ती कार्यवाही करावी.

**ब)** नेप्ती गेट ते पत्रकार चौक या रस्त्याचे कामाचे सुधारित अंदाजपत्रकास मान्यता देण्यांत येत आहे. आवश्यकतेप्रमाणे निधीची उपलब्धता लक्षात घेवुन काम करून घेण्यांत यावे. पाईपलाईन रस्त्याचे अंदाजपत्रक महानगरपालिकेमार्फत तयार करण्यास देखील मान्यता देण्यांत येत आहे.

मात्र दि.१५-९-२००८ च्या पत्रानुसार सर्वश्री.संजय चोपडा,मनेष साठे,सौ.कविता दहिफळे, अनिल शिंदे, सुरेश तिवारी, सौ.सविता मुदगल, अभय आगरकर, अर्जुन दातरंगे, भगवान फुलसौंदर, सौ.मनिषा भागानगरे, सौ.रोहिणी शेंडगे, सौ.पवित्राबाई सकट, सौ.कांताबाई शिंदे,सुभाष लोंढे इत्यादी सदस्यांचा सदर विषयास विरोध नोंदविण्यांत येत आहे.

सुचक : मा.श्री.कृ.द.जाधव

अनुमोदक :मा.श्री.कि.आ.डागवाले

ठराव बहुमताने मंजुर.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ६ दिनांक : १५-०९-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : सन २००८-२००९ मध्ये महानगरपालिकेतील मुलभूत सुविधांच्या विकासासाठी प्राप्त विशेष अनुदानातुन मुलभूत सोयी सुविधा पुरविणे बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ सादर.

--*--

प्रस्तावाचा मजकुर : मा.शासनाच्या शहरास चांगल्या दर्जाच्या नागरी सुविधा देता याव्यात याकरीता मा.शासन निर्णय क्र.संकिर्ण २००८ / प्र.क्र.८६ /०८/नवि -१६ दि.२७ ऑगस्ट २००८ चे अन्वये महानगरपालिकेस विकास कामे करण्यासाठी रूपये २.२४ कोटीचा विशेष निधी अहमदनगर महानगरपालिकेस प्राप्त झाला असुन प्राप्त निधीमध्ये महानगरपालिकेचा रू.२.२४ कोटी निधी समाविष्ट करावा लागेल. सदर प्राप्त निधी अंतर्गत खालील कामे प्रस्तावित करण्यांत आलेली आहेत.

पुढील प्रमाणे कामे व त्यांची अंदाजपत्रकीय रक्कम दर्शविणारा तक्ता.

| अ.नं. | कामांचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | औरंगाबाद रोड दसरेनगर ते नामदेव नगर चौक ते श्रीराम चौक ते मनमाड रोड (पाईप लाईन रोड ) या रस्त्याचे रूंदीकरण , मजबुतीकरण, व सुशोभिकरणासह डांबरीकरण करणे. | ३,५०,००,०००/- |
| २ | केडगांव औद्योगिक वसाहतीमधील अंतर्गत रस्त्याचे मजबुतीकरणासह डांबरीकरण करणे. | ८८,००,०००/- |
| ३ | प्र.क्र.५ इंदिरानगर झोपडपट्टी एम.एस.ई.बी.ऑफिस कोपरा ते भिंगार नाल्यापर्यंत रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. (हाजी हसन शाह कादरी कब्रस्तान जवळील रस्ता) | १०,००,०००/- |
| | एकुण | ४,४८,००,००० /- |

वरील सर्व १ ते ३ कामांचे ढोबळ अंदाजपत्रक तयार केले असता एकुण रूपये ४,४८,००,००० /- चे प्रस्ताव तयार करण्यांत आलेले आहे. सदरचा प्रस्ताव मान्यतेस्तव मा.महासभे समोर ठेवणे आवश्यक आहे. मंजुरीस्तव सादर.

यावर कार्यकारी अभियंता यांचा अभिप्राय की, अहवालाप्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, कामांचे प्रस्तावास तसेच ५० % हिस्सा व भाववाढ, देकार व इतर खर्च महानगरपालिका फंडातन करणेचे मान्यतेस्तव सादर.सदर रक्कमेबाबत नियोजन होणे आवश्यक.

यावर म.ुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, " अ " प्रमाणे मान्यतेस्तव.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की, मनपा फंडातुन यथावकाश व निधी उपलब्धतेनुसार महानगरपालिकेचा ५० % हिस्सा वर्ग करण्यांत येईल. तुर्त प्रस्तावास मान्यता देणे योग्य.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, "अ " प्रस्तावित नुसार मंजुरीसाठी मा.महासभेकडे प्रस्ताव पाठविणेसाठी मान्यतेस्तव सादर.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, नगरसचिव महासभेत घ्यावे.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट कार्यकारी अभियंता , शहर अभियंता , मुख्यलेखापरिक्षक , मुख्यलेखाधिकारी , मा.उपायुक्त (सा), मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.खास सभेपुढे ठेविला.

--*--

**ठराव :** ठरविण्यांत येते की, प्रस्तावात नमुद करण्यांत आलेली अंदाजपत्रके ढोबळ मानाने असल्याने निश्चित स्वरुपाची अंदाजपत्रक तयार करण्याबाबत कार्यवाही करण्यांत यावी.

सदरचे अंदाजपत्रक तयार झाल्यानंतर उपलब्ध तरतुदीमधुन रक्कम शिल्लक राहिल्यास त्या मध्ये समाविष्ट करावयाच्या प्रस्तावा बाबतचे अधिकार मा.महापौर यांना देणेस ही सभा मान्यता देत आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यांत यावी.

ऑफिस रिपोर्ट मंजूर तदनुषंगिक खर्च मंजूर. नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी.

सूचक : मा.श्री.कृ.द.जाधव.
अनुमोदक : मा.श्री.कि.आ.डागवाले.
ठराव बहुमताने मंजूर

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ७ दिनांक : १५-०९-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : नागापुर / बोल्हेगांव या उपनगरांसाठी स्मशानभुमि / दफनभुमि इत्यादी कामासाठी नागापूर स.नं.१३० / १ ही जागा संपादन करणे महानगरपालिका ठराव नं.७ दि. २८-०७-२००८ अन्वये झालेल्या ठरावा नुसार प्रस्ताव निर्णयास्तव सादर.

-- ** --

प्रस्तावाचा मजकुर : मौजे नागापूर,बोल्हेगाव इत्यादी अहमदनगर शहराच्या उत्तर बाजूकडील उपनगरात स्मशानभुमी तसेच दफनभुमीसाठी अधिकृत जागा उपलब्ध नसल्याने या भागासाठी स्मशानभुमी / दफनभुमीची व्यवस्था करण्यासाठी जागा उपलब्ध करुन मिळणेबाबतची यादी संदर्भीय पत्रान्वये मा.लोंढे सुभाष सोपानराव यांनी दिलेली आहे.तसेच संत जॉन बॉस्को चर्च सावेडी यांनी देखील या भागात ख्रिश्चन समाजासाठी दफनभूमीची व्यवस्था करण्यासाठी मागणी केलेली आहे.

सध्या स.नं १३०/१ नागापूर या जागेमध्ये अहमदनगर महानगरपालिकेमार्फत हिंदू स्मशानभूमि विकसित करण्यात आलेली आहे.तसेच याच स.नं मध्ये मातंग,ख्रिश्चन,मुस्लीम समाजाची दफनभुमी अस्तित्वात आहे.हिंदु स्मशानभुमी व्यतिरिक्त इतर कोणत्याही समाजाच्या दफनभूमीस महानगरपालिकेमार्फत कोणत्याही सुविधा पुरविण्यात आलेल्या नाहीत.हिंदू स्मशानभूमिस मात्र महानगरपालिकेने संरक्षक भिंत बांधलेली असून आतमध्ये देखील शेडचे बांधकाम केलेले आहे. (सन २००६-२००७ ) या बांधकामासाठी रुपये ४,९६,१५६/- इतका खर्च देखील करण्यात आलेला आहे.

मध्यंतरीच्या काळात स.नं १३०/१ मध्ये महानगरपालिकेने केलेले बांधकाम बेकायदेशीर असून ते माझ्या खाजगी जागेत केलेले आहे व ते त्वरीत पाडून टाकावे किंवा त्या जागेचा योग्य तो मोबदला मला दयावा अशा आशयाची तक्रार नागापूर स.नं १३०/१ या जागेचे मालक सौ.वर्षा बाळासाहेब सोनवणे यांनी लोकशाही दिनात मा.जिल्हाधिकारी ,अहमदनगर यांचेकडेस केलेली आहे.

उपरोक्त तक्रार अहमदनगर महानगरपालिकेस प्राप्त झाल्यानंतर त्या अनुषंगाने स.नं १३०/१ नागापूर या जागेच्या मालकी हक्काची तपासणी करण्यात आली या तपासणी अंती ही जागा सौ.वर्षा बाळासाहेब सोनवणे यांच्याच मालकीची असल्याचे सिध्द झाले ही वस्तूस्थिती लक्षात आल्यानंतर मा.आयुक्त,मा.महापौर व मा.सभापती स्थायी समिती ,अहमदनगर महानगरपालिका यांचे समवेत वरील परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी सविस्तर चर्चा करण्यात आली.तसेच जमीन मालक सौ.वर्षा सोनवणे यांचेशी सुध्दा जमिन घेण्याबाबत चर्चा झाली.त्यांनी देखील ही जमिन देण्याबाबत सकारात्मक प्रतिसादर दिलेला आहे.ही जमिन संपादित करणेबाबतचा या विभागाचा अहवाल खालीलप्रमाणे मुद्येनिहाय सादर करीत आहे.

१.संपुर्ण बोल्हेगांव / नागापूर परिसरासाठी विकसित केलेली अधिकृत स्माशानभूमि/ दफनभुमी उपलब्ध नाही ही वस्तूस्थिती आहे.नागापूर स.नं १३०/१ मध्ये सध्या वेगवगेळया समाजाच्या स्मशानभुमी / दफनभूमीचा वापर अनधिकृतरित्या होत आहे.

२.या संपुर्ण गट क्र. १३०/१ या जागेचे सर्वेक्षण केले असता ह जागा चिंचोळया पटटीच्या स्वरुपात असून त्या जागेतून उत्तर दक्षिण ६ मी.रुंदचा रस्ता विकसीत झालेला असून या रस्त्यांचाच पोहोच रस्ता म्हणून वापर करुन हिंदू स्मशानभूमी विकसित झालेली आहे.या स्मशानभूमीच्या दक्षिणेस मुस्लीम समाजाची दफनभूमि असून त्याच्या दक्षिणेस ख्रिश्चन समाजाची दफनभूमी आहे.तसेच याच जागेत मातंग समाजाची दफनभूमी देखील आहे.उर्वरीत भाग पडीक असून या जागेच्या पुर्वेस सिना नदी असून या सिना नदीमुळे या जागेपैकी काही भाग वाहून गेलेला आहे.

३.अहमदनगर शहराच्या वाढीव हद्यीचा प्रारुप विकास योजना आराखडा प्रसिध्द करण्यांत आलेला असून यातील प्रस्तावाप्रमाणे विषयांकीत जमिनीपैकी काही जमीन हरीतपटटा (Green Belt ) म्हणून दर्शविण्यात आलेली आहे.तर काही भाग विद्यमान स्मशानभुमी / दफनभूमी म्हणून दर्शविण्यात आला आहे. आता या जागेत स्मशानभूमी / दफनभूमी इत्यादी बाबी आरक्षण स्वरुपात दर्शवावयाच्या ठरल्यास या प्रस्तावास मा.महासभेच्या मंजुरी नंतर प्रारुप विकास योजनेच्या नियोजन समितीस हा प्रस्ताव पाठवावा लागेल म्हणजे ही समिती वरील फेरबदल विकास योजना आराखडयामध्ये दर्शवू शकेल.

४.उपरोक्त गट क्रमांक क्रमांक १३०/१ ही जागा संपादीत करण्याच्या धोरणात्मक निर्णयास मा.महासभेची मंजूरी अनिवार्य आहे.

५.भूसंपादनाची २००-२००८ या वर्षासाठी अंदाजपत्रकात रुपये ५,००,०००/- इतक्या रकमेची तरतूद केलेली आहे तसेच पुढील आर्थिक वर्ष २००८-२००९ मध्ये रक्कम रुपये ४०,७५,०००/- भूसंपादनासाठी प्रस्तावीत आहे.या निधीतून विषयांकीत जागेच्या भूसंपादनाचा खर्च भागविणे शक्य आहे.

६.जागेचे क्षेत्र :- २.७० हेक्टर ७/१२ उता-याप्रमाणे आहे.यापैकी सुमारे ०.६० हेक्टर जागेत हिंदू स्मशानभुमी असून मातंग समाजाच्या वापरात ०.११ हेक्टर जागा आहे.उर्वरीत सुमारे १.२० हेक्टर जागा ख्रिश्चन व मुस्लीम समाजाच्या दफनभुमीसाठी आहे.उर्वरीत जागेपैकी काही जागा रस्त्यात गेली असून काही जागा नदीच्या प्रवाहात वाहून गेली आहेतर उर्वरीत जागा खुली मोकळी आहे.जागेवरील परिस्थिती विचारात घेता ही उर्वरीत जागा वृक्षारोपण किंवा अन्य कारणासाठी महानगरपालिकेस भविष्यात वापरता येईल.त्यामुळे आजमितीस ही संपुर्ण जागा खरेदी करुन घेणे योग्य होईल किंवा आवश्यकतेप्रमाणे या जागेपैकी नेमकी किती जागा घ्यावयाची याचा निर्णय मा.महासभेच्या मंजुरीने मा.स्थायी समितीने घेणे योग्य होईल.

७.जागेचे मुल्यांकन :- प्रथम जागा खरेदी करावयाची किंवा कसे ? याबाबतचा धोरणत्मक निर्णय मा.महासभेने घेतल्यानंतर जागेच्या दरास व खरेदीच्या एकूण रकमेस मा.स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक असते.त्यामुळे याबाबतचा स्वतंत्र प्रस्ताव हा मा.महासभेच्या धोरणात्मक मंजुरी नंतर मा.स्थायी समितीस सादर करण्यात येईल.असे असले तरी या जागेची ढोबळमानाने किंमत खालीलप्रमाणे येवू शकेल.

नागापूर स.नं १३०/१ या जागेचा शिघ्र सिध्द गणकाचा दर (२००८ साठी ) रुपये ३००/- प्रति चौ.मि.शिघ्र सिध्द गणकातील पध्दती प्रमाणे या संपुर्ण जागेचे मुल्यांकन खालीलप्रमाणे येईल.

| | | |
|---|---|---|
| अ | रुपये ३००x२०००= | ६,००,०००/- |
| ब | रुपये ३००x२०००x०.८०= | ४,८०,०००/- |
| क | रुपये ३००x६०००x०.६०= | १०,८०,०००/- |
| ड | रुपये ३००x१७०००x०.४०= | २०,४०,०००/- |
| | रुपये | ४२,००,०००/- |

ई ) विषयांकीत जमिन सिना नदीच्या लगत असून विकास योजनेच्या हरीत पटटयात येते.तसेच ही जमिन चिंचोळया आकाराची आहे.या सर्व मुददयांचा मुल्यांकनावर प्रतिकुल परिणाम होणार आहे.या मुददयामुळे अर्थातच जागेचे मुल्यांकन कमी होणार आहे.हा तपशिलवार प्रस्ताव मा.स्थायी समितीस अलहिदा सादर करण्यात येईल.

सबब विषयांकीत जागा खाजगी वाटाघाटीने संपान करण्यासाठी मा.महासभेची धोरणात्मक मंजुरी मिळण्यासाठी सदर प्रस्ताव मा.महासभेस सादर करणे योग्य होईल.

यावर मा.उपायुक्त (सा ) यांचा अभिप्राय की,अ प्रस्तावितनुसार मा.महासभेकडे धोरणात्मक निर्णयासाठी पाठविणेकरीता मंजुरी देणेस हरकत नाही.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, मान्य

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, अ प्रमाणे प्रस्ताव महासभेपुढे ठेवावा.

अशाबाबतचा ऑफीस रिपोर्ट ,मा.उपायुक्त (सा ), मा.आयुक्त साहेब ,मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

--*--

**ठराव :** ठरविण्यांत येते की, नागापूर स्मशान भूमी / दफनभुमी साठी जागा उपलब्ध होणे या धोरणांस सर्वोच्च प्राधान्य देण्यांत येत आहे. मात्र जागेबाबतची व्यवस्था करतांना सदर ठिकाणी असलेल्या जागेचा परिसर मोजुन घेणेंत यावा. त्याच्या असलेल्या नोंदी देखील तपासणेंत याव्यात त्यानंतर मालकी हक्क कोणाचा आहे, याची सविस्तर माहिती घेण्यांत यावी. या सर्व तांत्रिक बाजु तपासून सदरच्या स्मशानभूमी / दफनभूमी साठी आवश्यक असणांरी जागा ही खाजगी मालकीची असल्यास सदर जागा संपादन करणें बाबत त्वरीत योग्य ती कार्यवाही करावी. खर्च मंजुर.

नियमानुसार कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.दशरथ शिंदे

अनुमोदक :मा.श्री.संजय लोंढे

ठराव बहुमताने मंजुर.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ६ दिनांक : १५-०९-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :** सन २००८-२००९ मध्ये महानगरपालिकेतील मुलभूत सुविधांच्या विकासासाठी प्राप्त विशेष अनुदानातुन मुलभूत सोयी सुविधा पुरविणे बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ सादर.

--*--

**ठराव :** ठरविण्यांत येते की, प्रस्तावात नमुद करण्यांत आलेली अंदाजपत्रके ढोबळ मानाने असल्याने निश्चित स्वरुपाची अंदाजपत्रक तयार करण्याबाबत कार्यवाही करण्यांत यावी.

सदरचे अंदाजपत्रक तयार झाल्यानंतर उपलब्ध तरतुदीमधुन रक्कम शिल्लक राहिल्यास त्या मध्ये समाविष्ट करावयाच्या प्रस्तावा बाबतचे अधिकार मा.महापौर यांना देणेस ही सभा मान्यता देत आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यांत यावी.

ऑफिस रिपोर्ट मंजूर तदनुषंगिक खर्च मंजूर. नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी.

सूचक : मा.श्री.कृ.द.जाधव.

अनुमोदक : मा.श्री.कि.आ.डागवाले.

ठराव बहुमताने मंजूर

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# दिनांक १५-०९-२००८ रोजी झालेल्या मा.खास सभेतील चर्चा

**विषय क्र. १ मागील कार्यवृत्त कायम करणे.**

या विषयावर चर्चा सुरू असतांना

मा.श्री.कृ.द.जाधव आज हिंदी दिन असल्यामुळे व हिंदी ही राष्ट्र भाषा असल्यामुळे हिंदीत कामकाज करावे असे सूचविले.

मा.श्री.दिप चव्हाण - महानगरपालिका क्षेत्रामध्ये सध्या गणेशोत्सव, रमजान उत्सव तसेच नवरात्राचे दिवस आहेत. केअरटेकर यांना जिल्हा निवडणुक कार्यालयाकडे निवडणुककामी पाठविले आलेले आहे. तसेच बरेचसे कर्मचारी जकात विभागाकडे गेलेले असल्यामुळे महानगरपालिकेचे काम ठप्प झालेले आहे, आरोग्याचे प्रश्न निर्माण झालेले आहे. तेंव्हा याकामी काय उपाययोजना करणार आहात ?

मा.श्री.दिपक सुळ - उपमहापौर - बरेचसे कर्मचारी इलेक्शन ड्युटी करीता दिलेले असल्यामुळे कामावर परिणाम झालेला आहे खरे आहे त्याकरीता शासनाकडे पत्रव्यवहार करावा.

यावर मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, मा.जिल्हाधिकारी साहेब यांना याकामी अर्ध शासकीय पत्र (डिओ लेटर) देवून कर्मचारी मुक्त करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

मा.महापौर - केअरटेकर उपलब्ध नसल्यामुळे आरोग्याचे प्रश्न निर्माण झालेले आहेत. सफाई कामे कोणाकडून करावयाची व कोणाकडून करून घ्यावयाची हा ही प्रश्न आहे. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाकडे महानगरपालिकेचे किती कर्मचारी आहेत व कोणाकडे किती कर्मचारी आहेत याबाबत आस्थापना विभागाने माहिती द्यावी.

मा.श्री.दिप चव्हाण - कर्मचा-यांना वर्षा नु वर्षे अशाप्रकारे ड्युट्या दिल्या जातात.

मा.श्री.गिरवले - प्रत्यक्षात किती लोक जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविले आहेत याबाबत आस्थापना विभागासही माहिती नाही.

मा.महापौर - सध्या ३१५ कर्मचारी कमी आहेत. महापालिकेचे काम ठप्प झालेले आहे.

मा.श्री.कृ .द.जाधव - महानगरपालिकेचे पदाधिकारी व अधिकारी यांचेकडे नियमानुसार किती लोक पाहीजे. अधिका-यांकडे ४ / ४ बाया काम करतांत याबाबत सखोल चौकशी करावी. गार्डन विभागाचे श्री.गोयल यांना चौकशीस बाधा न येता कामावर हजर करून घेण्यात आले. परंतु त्यांना मोटार व्हेईकल विभागामध्ये काम देण्यात आले आहे. वास्तविक मोटार व्हेईकलचा आणि त्यांच्या कामाचा संबंध नाही. त्यांना मोटारी मधील काहीच माहिती नाही. त्यांना कसेकाय तिकडे पाठविण्यात आले.

यावर मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, श्री.गोयल यांना त्यांच्यावर ठेवण्यात आलेल्या आरोपाबाबत चौकशीस बाधा न येता कामावर हजर करून घेण्यात आले आहे. मोटार व्हेईकल विभागाचे श्री.कुमार सेवानिवृत्त झाल्यामुळे कामाचे सोयीसाठी सदर विभागात श्री.गोयल यांना नेमण्यात आले आहे.

मा.महापौर - कामाचे सोयीसाठी श्री.गोयल यांना मोटार व्हेईकल विभागात नेमले आहे.

मा.श्री.आगरकर - श्री.गोयल दोषी आढळून आल्याने त्यांच्यावर काय कारवाई केली आहे. यापूर्वी ते कितीवेळ निलंबीत झाले आहेत. एखाद्या गोष्टीमुळे संस्थेचे अहीत किती प्रमाणात होत आहेत. यापूर्वी पर्यावरणाचा खर्च विहीत पध्दतीने केलेला नव्हता. त्यांचेबाबत विभागीय चौकशी लावण्यात आलेली आहे याबाबत लेबर ऑफिसर यांनी खुलासा करावा.

मा.श्री.नामदेव पवार - श्री.गोयल यांना दुसरे कोणते तरी पद देण्यात यावे.

विषय क्र. १ वर पुढील चर्चा

मा.श्री.वाकळे बहिरनाथ - यापूर्वी दि. २५-०६-२००८ च्या सभेमध्ये ८ वी वर्ग चालू करण्याबाबत ठराव मंजुर करण्यात आलेला होता. त्याबाबत काय कारवाई करण्यात आली याबाबत उपायुक्त यांनी खुलासा करावा असे सूचविले असता महानगरपालिका शिक्षण मंडळाचे प्रशासनाधिकारी श्री.गुळवे यांनी खुलासा केला की, याबाबत ठराव नं. ४ दि. २५-०६-२००८ अन्वये मंजुरी दिलेली होती. तथापि याबाबत शासनाकडून महानगरपालिकेला ८ वी चे वर्ग चालू करणेबाबत मंजुरी मिळाली नाही. महानगरपालिका अनधिकृतपणे पुढील वर्ग, शाळा चालविता येणार नाही. शासनाची परवानगी आल्यानंतरच कार्यवाही करता येईल. त्याकरीता आत याला पुढील एक वर्ष मुदतवाढ घ्यावी व पुढील वर्षी परवानगी आल्यानंतर चालू करीता येईल असा प्रस्ताव पाठविला आहे असे सांगितले.

मा.श्री.आगरकर - प्राथमिक शाळा शिक्षण मंडळाला माध्यमिक शाळा चालू करता येतात काय ? हा प्रश्न उपस्थित केला.

याबाबत प्रशासनाधिकारी श्री.गुळवे यांनी परत खुलासा केला.

मा.श्री.कावरे आसाराम - आमुच्या वॉर्डातील महानगरपालिका शाळांना विद्यार्थ्यांना बसण्याकरीता बाकडे माझ्या नगरसेवक विकास निधीमधुन उपलब्ध करून द्यावेत.

मा.श्री.दिप चव्हाण - मागील दि.२५-०६-०८ च्या सभेमध्ये प्रस्ताव क्र.६ मध्ये घनकचरा प्रकल्पा बाबत मा.आयुक्त यांना अधिकार दिलेले होते. त्याबाबत खुलासा करण्यांत यावा. यावर मा.उपायुक्त यांनी खुलासा केला की, ठरावा प्रमाणे कार्यवाही केलेली आहे. व याबाबत चर्चाही झालेली आहे. संबंधित पार्टी याबाबत महानगरपालिका मंजुरी कशी देणांर आहे. यावर काम करण्यांस तयार आहे काय याबाबत विचारणा केलेली आहे. तथापि त्यांचेकडुन अद्यापी उत्तर आलेले नाही. त्यावर मा.श्री.दिप चव्हाण यांनी विचारले की, याबाबत महानगरपालिका मंजुरी कशी देणांर आहे. मा.उपमहापौर श्री.दिपक सुळ यांनी खुलासा केला की, त्यांना मान्य असेल तर करारनामा करू अन्यथा रद्य होईल.

मा.श्री.कृ.द.जाधव - अप्पु चौक सुशोभिकरण मार्गी लागलेले नाही. तसेच इतरही चौकातील दोन ते तीन ठिकाणच्या जागा महत्वाच्या आहेत. महानगरपालिकेने हत्ती आणुन योग्य ठिकाणी बसविलेला नाही. इंजिनिअर यांच्या मताप्रमाणे व्यवस्था करावी. भटके कुत्रे बाबत काय व्यवस्था आहे. बालिकाश्रम रोडवर वर इतर ठिकाणी बरेच भटके कुत्रे आहे. त्याबाबत व्यवस्था करण्यांत यावी. यापुर्वीचा ठेकेदार यांचा उपक्रम बंद पडलेला आहे. यावर मा.श्री.नामदेव पवार यांनी सांगितले की, भटक्या कुत्र्यांवर कारवाई करणेसाठी मनपाने टोल फ्री क्रमांक देण्यांत यावा. यावर मा.श्री.दिपक सुळ यांनी सांगितले की, भटक्या कुत्रे संबंधी पार्टी काम करण्यांस तयार नाही. यावर मा.श्री.गारूडकर यांनी सांगितले की, भटक्यां कुत्र्यांसाठी गावाच्या बाहेर जागा देण्यांत यावी. व टोल फ्री नंबर देण्यांत यावा.

मा.श्री.उडाणशिवे -- मागील सभेमध्ये विषय उपस्थित केला होता की, दलित वस्तीतील समाज मंदिर याचा वापर योग्य रितीने केला जात नाही. व समाज मंदिर प्रत्यक्ष दलित समाजातील लोकांना वापरण्यांस मिळत नाही. यावर उपमहापौर श्री.सुळ यांनी सांगितले की, बांधकाम विभागाने सदरचे समाज मंदिर ताब्यात घ्यावे. व त्याचा उपयोग महानगरपालिकेच्या माध्यमातुन होईल असे पहावे. त्यावर मा.श्री.उडाणशिवे यांनी सांगितले की, अशाप्रकारे ज्या - ज्या समाजमंदिराच्या जागा असतील त्याबाबत चौकशी करावी. यावर मा.महापौर यांनी पुढील सभेच्या वेळी चौकशी करून अहवाल सादर करणेबाबत सिटी इंजिनिअर यांना आदेश दिले. व पुढील महासभेपुढे माहिती द्यावी असे सांगितले.

मा.सौ.साहनी -- मा.आयुक्त यांनी आमच्या वॉर्डामध्ये व्हिजीट दिली व मुरूम टाकण्यांचे आदेश दिले होते. परंतु अद्यापपर्यंत मुरूम टाकण्यांत आलेला नाही. तेंव्हा उपोषणास बसु काय ?

मुरूमासाठी आयुक्तांच्या भेटीचे कारण काय ? याबाबत निर्णय आपण कधी घेणार आहे. यावर मा.महापौर यांनी सांगितले की मुरूम झोन ऑफिसकडे मागणी केल्यास मुरूमाची व्यवस्था त्वरीत केली पाहिजे. अशा सुचना दिल्यात.

--*--

**विषय क्रमांक : ३ -** सदरचा विषय दु.३ वा.चर्चेला आला. विषय वाचून दाखविण्यांत आला. त्यावर खालील प्रमाणे चर्चा झाली.

मा.श्री.कानडे : सदरचा विषय मा.श्री.अविनाशजी घुले, सभापती यांनी पत्र देवुन मांडलेला आहे. तथापि सदरचा विषय मंजुर करण्यां बाबत सुचविले.

मा.श्री.वाकळे : सदरचा विषय सामाजिक न्याय भवन, बांधण्याबाबत सुचविलेला आहे. त्याचा न्यायप्रक्रियेशी संबंध नाही. सदर ठिकाणी सगळे विभाग एकत्रित येणांर आहेत.

मा.श्री.अविनाश घुले : याबाबत शासन निर्णय झालेला आहे. व धोरणात्मक बाब असल्यामुळे महासभेपुढे सदर विषय आलेला आहे.

मा.श्री.सुळ : न्याय प्रविष्ट झालेला असतांना चर्चा करणे इष्ट नाही.

मा.श्री.नामदेव पवार : सदर जागा वापरा बाबतचा झोन बदलणे आवश्यक आहे.

--*--

**विषय क्रमांक : ४** नागरिकांचा जाहिरनामा मंजुरीसाठी. सदरचा विषय दु.३ वाचुन १० मिनिटांनी चर्चेला आला.सदरचा ऑफिस रिपोर्ट वाचुन दाखविण्यांत आला त्यावर खालील प्रमाणे चर्चा झाली.

मा.श्री.वाकळे : नागरिकांचा जाहिरनामा केंव्हा प्रसिध्द केला याची माहिती नाही.

मा.उपायुक्त : यांनी खुलासा केला केला की नागरिकांचा जाहिरनामा यापुर्वीच प्रसिध्द केला आहे. व त्याच्या प्रती सर्वांना पाठविलेल्या आहेत. यावर मा.श्री.दिप चव्हाण यांनी सांगितले की जाहिरनाम्याची प्रत द्यावी. त्यावर उपायुक्त यांनी सांगितले की, नागरिकांचा जाहिरनामा जुनाच आहे. त्यामध्ये काही नविन सुधारणा करण्यांकरीता जाहिरनाम्याच्या प्रती सोबत पाठविलेल्या आहेत. व मंजुरी नुसार सुधारणा केल्या जातील असे सांगितले.

मा.श्री.कानडे : नागरिकांच्या जाहिरनाम्याप्रमाणे विहीत मुदतीत निपटारा न करणां-या कर्मचा-यांना विलंबाबाबत प्रति दिवशी रू.२५ /- दंड आकारणे बाबत सुचविलेले आहे. ही दंडाची आकारणी वाढविणे आवश्यक आहे. जेणेकरून कामकाजामध्ये सुधारणा होवुन कामांस गती येवु शकेल. याकरीता सदर दंडाची आकारणी रू.५० /- करणे बाबत सुचविले.

मा.श्री.नामदेव पवार : गुंठेवारी कायद्यानुसारही विलंबा बाबत दंडाची तरतुद करण्यांत यावी.

मा.श्री.फुलसौंदर : गुंठेवारी बाबत महिन्यातुन एकदा कँप घ्यावा. त्यानंतर अशाबाबत २ ऑक्टोंबर २००८ रोजी गुंठेवारी बाबतचा कँप घेण्यांबाबत मा.आयुक्त साहेब यांनी सुचना दिली.

मा.श्री.कानडे : स.नं.८२ मध्ये ग्रूप रौ-हौसिंग स्कीम झालेली आहे. सदर ठिकाणच्या बिल्डरने बांधकामाची परवानगी मागितलेली नाही. या ठिकाणी लोक रहावयास आलेले आहे. व एकुण स्कीम ४ हजार घरांची होणांर आहे. त्यामुळे महानगरपालिकेचे या ठिकाणाबाबतचे नुकसान होणार आहे. तरी नविन प्लॅन तपासुन घ्यावा. यावर मा.आयुक्त यांनी या ठिकाणी समक्ष जावुन पाहणी करण्यांत येईल व उचित कार्यवाही करण्यांत येईल अशा सुचना दिल्या.

मा.श्री.आगरकर : बांधकाम परवानगी देतांना बांधकामाच्या प्लींथपर्यंतच परवानगी देणे आवश्यक आहे. तसेच बांधकाम परवानी देण्यांचा कालावधी ३० दिवसांचा करण्यांत यावा. व टप्प्याटप्प्यानुसार बांधकाम परवानगी दिली पाहिजे.सँक्शन प्लॅनप्रमाणे कामे होतील. त्यात काही सुसूत्रता असावी. व परवानगीचा कालावधी ६० दिवसाऐवजी ३० दिवसांचा करावा.

मा.श्री.कानडे : परवानगी कालावधी ३० दिवसांचा करता येवु शकतो काय ?
मा.श्री.फुलसौंदर : पॅनलवर इंजिनिअर घेवुन बांधकाम परवानगी व तदनुषंगिक कामे करणे शक्य आहे. मा.महापौर यांनी सुचविले की, ३० दिवसाचा कालावधी करण्यांस काय हरकत आहे.
मा.श्री.आगरकर : पुर्णत्वाचा दाखला १५ दिवसात मुदतीत देण्यांत यावा. व कंम्प्लीशन बाबत आरोग्य अधिकारी यांचा दाखला ७ दिवसात घेण्यांत यावा.
चर्चेमध्ये डी.पी.प्लॅन क्र.५ व ६ चे काम बंद करण्यांत यावे अशाबाबत सुचविण्यांत आले. तसेच डी.पी.युनिटही बंद करण्यांत यावे.
नविन नळ कनेक्शनची मुदत ३० दिवस ऐवजी १५ दिवस करण्यांत यावी.
बांधकाम परवानगी दिल्यानंतर नागरिक रौ-हौसिंग किंवा फ्लॅटस विकत घेतात. त्याबाबतचे परवानगी बाबतचे जाहिर प्रकटन प्रसिध्द करण्यांत यावे.

-- * --

**विषय क्रमांक : ५ -** सदरचा विषय दुपारी ४.५० वाजता चर्चेला आला व खालील प्रमाणे चर्चा झाली.
मा.श्री.त्रिपाठी : सदरचा विषय शहर अभियंता यांनी चुकीच्या पध्दतीने पाठविलेला आहे. वॉर्ड नं.५,६, व ९ इ.प्रभागातील नगरसेवकांची एकानेही मागणी केलेली नाही. असे असतांना हा प्रस्ताव सादर झालेला आहे. याचा गांभीर्याने विचार करावा. सदरच्या रस्त्यावर आनंद ऋषी हॉस्पीटल नंतर आनंद ऋषीजी यांचे राष्ट्रीय समाधीस्थळ तसेच नागरी वस्ती आहे. मनपाने सदरचा रस्ता शासनाकडे वर्ग केल्यास २५ हजार नागरिकांचा रोष महानगरपालिकेला पत्करावा लागेल. हा रस्ता वर्ग केल्यास या रस्त्यावरील सर्व बांधकामे व इतर परवानगी घ्यावयाची झाल्यास शासनाकडुन घ्यावी लागेल. तसेच रस्ते दुरूस्तीही त्यांचे मार्फतच करावी लागेल. सक्कर चौक ते इंपिरियल चौकापर्यंत व पुढे उड्डाण पुल होणांरच आहे. त्यामुळे या रस्त्याची आवश्यकता नाही. नागरिकांची या रस्त्यामुळे मोठया प्रमाणात गैरसोय होणार आहे. त्यामुळे सदरचा रस्ता सार्व.बांधकाम खात्याकडे वर्ग करू नये. त्यास माझा विरोध नोंदविण्यांत यावा.
मा.सौ.भागानगरे : सदर रस्त्यावर मोठया प्रमाणात नागरी वस्ती व घरे आहेत. विविध हॉस्पीटल आहेत. शाळा मार्केट , मंगल कार्यालय इ. असल्यामुळे सदर रस्त्यावर जड वाहतुकीमुळे वाहनांची वर्दळ वाढुन मोठे अपघात होण्यांची शक्यता आहे. त्यामुळे सदरचा गांभिर्याने विचार करून सदरचा यश पॅलेस ते कोठी हा रस्ता शासनाकडे कोणत्याही प्रकारे वर्ग करू नये व राज्य मार्ग करू नये असे सांगितले.
मा.श्री.फुलसौंदर - यश पॅलेस ते कोठी या रस्त्यावर ४-५ हॉस्पीटल तसेच आनंद ऋषीजी हे मोठे हॉस्पीटल,मार्केट यार्ड, आय.टी.आय., बरीच मंगल कार्यालये , सारसनगर , माणिकनगर, इत्यादी नागरी वसाहती आहेत. तसेच कोठी विभागात सर्व सामान्य नागरीक यांची वसाहत आहे. या रस्त्याची रूंदी ३० मीटर अशी आहे. या रस्त्याची मागणी पी.डब्ल्यु.डी.ने केलेली आहे काय ? हायवे स्टॅण्डर्डचा हा रस्ता आहे काय ? या रस्त्याचा फायदा नगर शहराला राहणांर नाही. व त्यामुळे नागरिकांचे नुकसान होईल. या रस्त्यावर सध्या अस्तित्वात असलेली बांधकामे अतिक्रमण म्हणुन घोषित करणार काय ? व याचा विचार आपण करणांर आहात काय ? या भागातील काही सर्वसामान्य नागरिकांचे उत्पन्न एक ते दिड हजाराचे आसपास आहे. रिंग रोडचा आग्रह धरल्यास या रस्त्याची जरूरी भासणार नाही. हा रस्ता हाय-वे म्हणुन वर्ग केल्यास या रस्त्यावरील वाहतुक मोठया प्रमाणांत वाढल्यामुळे अपघाताची जास्त शक्यता आहे. तरी भविष्याचा वेध घेवुन सदरचा रस्ता महानगरपालिकेने करावा. सभागृहाला विनंती करतो की, सदर रस्त्याचे हाय-वे स्टॅण्डर्ड नसल्यामुळे सदरचा रस्ता राज्य मार्ग करू नये अशी मी मागणी करतो.

मा.श्री.साठे - यश पॅलेस ते कोठी हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करू नये अशी मी भारतीय जनता पक्ष व शिवसेना या दोन्ही पक्षाच्या वतीने मागणी करीत आहे. व यास माझा विरोध नोंदवावा.

मा.श्री.अनिल शिंदे - सदर रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करू नये या रस्त्यावर मोठया प्रमाणात नागरी वसाहत , जैन स्थानक, वस्तीगृह आहे. देशातुन आणि परदेशातुन या ठिकाणी भाविक येत असतात. जड वाहनांच्या वाहतुकीमुळे या रस्त्यावरील प्रदुषण वाढणार आहे. सदर भागातील ब-याचशा नागरिकांचा विरोध असल्यामुळे सदरचा रस्ता वर्ग करू नये असा माझा भाजपा - शिवसेना यांचेवतीने विरोध नोंदवावा.

मा.श्री.संजय चोपडा - यश पॅलेस ते कोठी या रस्त्यावर ५ - ६ मंगल कार्यालय आहे. तसेच बरीच हॉस्पीटल्स, चर्च, तसेच जैन मंदिर हे हजारो जैन लोकांचे आदरस्थान आहे. देशातुन आणि परदेशातुन या ठिकाणी लाखो नागरिक येत असतात. सदरचा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग केला तर सदर विभागातील वातावरण प्रदुषित व खराब होईल. व मोठया प्रमाणावर गर्दी वाढुन दुचाकी वाहन सुध्दा चालविता येणार नाही. अपघाताचे प्रमाण वाढेल व महानगरपालिकेचा या रस्त्यावर हक्क राहणार नाही. तरी सदरचा रस्ता हा सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यांत येवु नये असा विरोध नोंदवावा.

मा.श्री.आगरकर - यश पॅलेस ते कोठी हा रस्ता हस्तांतर करणेंबाबतचा रिपोर्टावरील भुमिका ही सार्वजनिक बांधकाम विभागाची आहे. की महानगरपालिकेची आहे याबाबत कुठल्याही प्रकारची स्पष्टोक्ती नाही.सार्वजनिक बांधकाम विभागाने याबाबत मागणी केलेली नाही. सदर रस्ता नविन तयार करणेबाबत महानगरपालिकेने श्रीखंडे कन्स्ल्टंट यांची नेमणुक केलेली होती. व महानगरपालिकेने सदर रस्त्याचे काम प्रस्तावित केलेले होते. तथापि महानगरपालिकेला याकरीता फंड किंवा अनुदान उपलब्ध झालेले नाही. आजच्या सर्वसाधारण सभेपुढील विषय क्रमांक ६ मध्ये मुलभुत सुविधा पुरविण्यांसाठी ४ कोटी ४८ लाख इ.कामाचे प्रस्ताव सादर करण्यांत आलेले आहेत. असे असतांना सदर रस्त्यासाठी फंड किंवा अनुदान उपलब्ध नाही. हे आपण कसे म्हणु शकातो हे समजु शकत नाही. सदर रस्त्याबाबत नागरिकांच्या भावना तीव्र स्वरूपाच्या आहेत. त्यामुळे सदरचा रस्ता मनपा मार्फत झाला पाहिजे. सदर रस्त्यावर धार्मिक स्थळे असल्यांने त्या दृष्टीने रस्त्याचे महत्व आहे. राज्य महामार्गाचे नॉर्म्स पुर्ण होत नाही. महानगरपालिकेचे इंजिनिअर यांनी हा रिपोर्ट सादर केलेला आहे. सिटी इंजिनिअर महानगरपालिका यांचेकडुन अपेक्षा करतो की, विषय सादर होतांना स्पष्ट मत नोंदविले पाहिजे. या रस्त्याकरीता फंड नाही हे कारण अयोग्य आहे. मनपा टप्प्याटप्प्याने हा रस्ता करू शकते. विकासाच्या प्रश्नावर आम्ही जरूर सहकार्य करू सक्कर चौका पासुन उड्डाण पुलाची ख-या अर्थाने आवश्यकता आहे. व उड्डाणपूल होणे ही काळाची गरज आहे. तथापि याबाबतीत काही तरी राजकीय वास असल्याचे दिसुन येते. उड्डाणपूला संदर्भामध्ये महानगरपालिकेची काय भुमिका आहे , १०० % उड्डाणपूल झालाच पाहिजे. अशा रितीने मनपाची मागणी झाली पाहिजे. याबाबत कोणत्या लोकप्रतिनिधीने रस्त्याची मागणी केलेली आहे त्यांचे नांव यामध्ये दिसुन येत नाही. पुलाचे अनन्य साधारण महत्व आहे. तरी सदरच्या रस्ता हस्तांतरणांस आमचा विरोध नोंदवावा.

मा.श्री.गिरवले - यश पॅलेस ते कोठी रस्त्याबाबत चर्चा चालू आहे. सदर रस्त्याबाबत जर विचार केला तर नगर शहराच्या दृष्टीने हा नव्यांने रस्ता तयार होणार आहे. सार्वजनिक बांधकाम खात्यालाही रस्त्या बाबत मोठया अडचणी येतात व त्यांच्या कामांचा अनुभवही वाईट प्रमाणांत आहे. यापुर्वी नागरिकांच्या मागणीवरून बांधकाम विभागाचे रस्ते आपण मनपाकडुन हस्तांतरीत करून घेतलेले आहे. मग हाच रस्ता बांधकाम विभागाकडे हस्तांतरीत करावयाचे कारण काय ? या रस्त्यावरील बराचसा भाग हा निवासी भाग झालेला आहे. हा रस्ता हस्तांतरीत केल्यास मनपा त्यावर काहीच करू शकणांर नाही. व बांधकाम विभागही रस्त्याची व्यवस्थित देखभाल करू

शकणांर नाही. मनपा मार्फत रस्ता करण्यांकरीता कर्ज उपलब्ध करून घ्यावे. रस्ता ट्रान्स्फर करण्यांचे काही कारण नाही.

मा.श्री.नामदेव पवार - सदरच्या रस्त्याबाबत जो प्रस्ताव मनपाने दिलेला आहे त्यामध्ये बाहय वळण रस्त्याचे कामामध्ये व उड्डाण पुलाची आवश्यकता राहणार नाही. हे मत कोणाचे आहे याबाबत सिटी इंजिनिअर यांनी खुलासा करावा असे सुचविले. नविन हाय-वे मुळे उड्डाणपूल रद्द होत नाही. यापुर्वीचा ६० फुटी रस्ता तसाच ठेवावा. कारण बांधकाम विभाग करणांर नाही. पी.डब्ल्यु.डी.कडे रस्ता हस्तांतरीत न करता मनपाने करावा.

मा.श्री.कृ.द.जाधव - सदरचा प्रस्तावाचा विषय हा चुकीच्या पध्दतीने दिलेला आहे. उड्डाण पूल होणांर किंवा होणांर नाही हा गोंधळ निर्माण झालेला आहे. रस्ता हस्तांतर करतांना महानगरपालिकेने अटीयुक्त ठराव करून रस्त्यावरील नागरिकांना कोणताही त्रास होणांर नाही. अशारितीने हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरीत करण्यांस हरकत नाही.

मा.श्री.कावरे - चांगले रस्ते व्हावे ही मनपाची इच्छा आहे. व त्याबाबत मी महापौरांना विनंती करतो.

मा.महापौर - उपरोक्त चर्चेवर महापौर यांनी खुलासा केला की, गेल्या दोन तीन दिवसांमध्ये स्थानिक वृत्तपत्रांमध्ये सदरच्या रस्त्याबाबत काही वृत्त छापून आलेले आहे. मनपाच्या वतीने सहा रस्ते करण्यांबाबतचा विषय घेत असतांना श्रीखंडे कंन्सल्टंट यांची नियुक्ती केलेली होती. व प्रमुख दोन रस्त्यांचे एस्टीमेंट पाहता सदर रस्त्यांवरील ९ कोटीचे अंदाजपत्रकावर मनपा खर्च करू शकणांर नाही. सदर रस्त्यावरील यापुर्वी असणा-या ॲक्टिव्हिटी एकेक करून सोडविलेल्या आहेत. व ड्रेनेजची अडचण होती ती दूर केलेली आहे. व महत्वाचे काम पुर्ण केलेले आहे. तसेच या रस्त्यालगतचा जोडणांरा इतर भाग यावरही १ कोटी ४७ लाख खर्च करून रस्ते व्यवस्थित केलेले आहे. या रस्त्यावर उड्डाणपूल रद्य होणार नाही याबाबत आम्ही प्रयत्न केलेले नव्हते.

आज डी.एस.पी.चौक ते केडगांव पर्यंत जाण्यांस वाहतुकीला दीड ते दोन तासाचा वेळ लागत आहे. नियोजित रस्त्यावर ९ कोटीचा खर्च आपण करू शकणांर नाही. त्यामुळे सदरचा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यांस काय हरकत आहे. रिंग रोड व उड्डाणपूल होणारच आहे याबाबत आम्ही मा.ना.छगनरावजी भुजबळ यांची भेट घेतली आहे. नविन रस्त्यावरील नॉर्म्स हे मनपा , नगर रचना कायद्याप्रमाणेच आहे. व त्याचप्रमाणे बांधकाम परवानगी मिळणांर आहे.

सदर रस्त्याकामी फक्त अर्बन बँकच कर्ज देवु शकते इतर बँका कर्ज देवु शकत नाही अशी माहिती मनपाला मिळालेली आहे.

शहरामधील नागरिकांना या नविन रस्त्यावर टोल भरण्याची आवश्यकता राहणार नाही. व उड्डाणपूल होणारच आहे. व त्याकरीता मी आपणांसर्वांबरोबरच आहे. उड्डाण पूलासह बायपास रस्ता होणार आहे तर काय हरकत आहे. सार्वजनिक बांधकाम खात्याकडून हा रस्ता साडे नउ कोटीचा बी.ओ.टी.तत्वावर होणांर असल्याने व त्याबाबतचा मेंटेंनन्स करण्यांची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम खात्यावरच असणार आहे.

नेप्ती गेट ते पत्रकार चौक या रस्त्याचे एस्टीमेंट आता सात ते साडेसात कोटीचे झालेले आहे. त्याबाबतही मंजुरी द्यावी. तसेच पाईपलाईन रोडचे अंदाजपत्रक महानगरपालिकेमार्फत उपलब्ध तरतुदीचे अनुषंगाने करण्यांत यावे.

यानंतर सभागृहामध्ये सर्व सदस्यांनी एकाच वेळी बोलण्यांचा प्रयत्न केल्यामुळे सभागृहामध्ये गोंधळा झ ाला व सायंकाळी ६-०५ वा. मा.श्री.आगरकर, मा.श्री.फुलसौंदर,मा.श्री.दातरंगे, मा.श्री.चोपडा, मा.श्री.शिंदे , मा.श्री.साठे इ.यांनी आमचा या रस्त्यासाठी विरोध असल्यामुळे आम्ही सभात्याग करीत आहोत असे सांगुन सभात्याग केला.

तदनंतर विषय क्रमांक ६,७ व ८ बहुमताने मंजुर होवुन सभेचे कामकाज सायं.६-४५वा.संपल्याचे मा.महापौर साहेब यांनी घोषित करून सभा समाप्त झाली.

---*---

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ५ दिनांक : १५-०९-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : यश पॅलेस ते कोठी रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरीत करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ सादर.

--*--

ठराव : **अ)** ऑफिस रिपोर्ट व मा.सभागृहात झालेली चर्चा यानुसार ठरविण्यांत येते की, सदर यश पॅलेस ते कोठी रस्ता सुधारणा करणेसाठी सार्व.बांधकाम विभागाकडे हस्तांतरीत करण्यांस तसेच रस्ता हस्तांतरीत झाल्यानंतर इमारती बांधकामाचे आज रोजी अस्तित्वात असलेले सर्व नियम लागु राहतील. या अटीसह मान्यता देण्यांत येत आहे. मात्र मा.शासनाने इंम्पिरिअल चौक ते कोठी रस्ता या दरम्यान उड्डाणपुल बांधण्याचे नियोजीत आहे. ते देखील काम लवकरात लवकर मा.शासनाने हाती घेणेत यावे.

मात्र यश पॅलेस ते कोठी रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरीत करणेत आल्या नंतर संबंधितांकडून सदरच्या प्रक्रीयेस विलंब दिसत असल्यास नागरी सुविधा देणे बाब सर्वोच्च असलेने महानगरपालिकेने सदरचा रस्ता करणे बाबत योग्य ती कार्यवाही करावी.

**ब)** नेप्ती गेट ते पत्रकार चौक या रस्त्याचे कामाचे सुधारित अंदाजपत्रकास मान्यता देण्यांत येत आहे. आवश्यकतेप्रमाणे निधीची उपलब्धता लक्षात घेवुन काम करून घेण्यांत यावे. पाईपलाईन रस्त्याचे अंदाजपत्रक महानगरपालिकेमार्फत तयार करण्यास देखील मान्यता देण्यांत येत आहे.

मात्र दि.१५-९-२००८ च्या पत्रानुसार सर्वश्री.संजय चोपडा,मनेष साठे,सौ.कविता दहिफळे, अनिल शिंदे, सुरेश तिवारी, सौ.सविता मुदगल, अभय आगरकर, अर्जुन दातरंगे, भगवान फुलसौंदर, सौ.मनिषा भागानगरे, सौ.रोहिणी शेंडगे, सौ.पवित्राबाई सकट, सौ.कांताबाई शिंदे,सुभाष लोंढे इत्यादी सदस्यांचा सदर विषयास विरोध नोंदविण्यांत येत आहे.

सुचक : मा.श्री.कृ.द.जाधव

अनुमोदक :मा.श्री.कि.आ.डागवाले

ठराव बहुमताने मंजुर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : १ दिनांक : १५-०९-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :** दिनांक २५-०६-२००८ रोजी झालेल्या मा.सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

--*--

**ठराव :** ऑफिस रिपोर्ट व सभेमध्ये झालेल्या साधक-बाधक चर्चेनुसार ठरविण्यांत येते की, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पा बाबत करण्यांत आलेल्या करारनाम्यातुन अट क्रमांक २१ च्या अनुषंगाने मा.शासनाकडुन प्राप्त होणारा ( १२ वा / १३ वा वित्तआयोग ) वित्त आयोगाचा निधी अंतर्गत प्राप्त होणारे कोणतेही अनुदान कंत्राटदारास अनुज्ञेय होणार नाही तथापि या व्यतिरिक्त संबंधित कंत्राटदाराने इतर प्राप्त होणारे अनुदान प्राप्त करुन घेतल्यास ते अनुज्ञेय राहील.

ठराव क्रमांक ६ दिनांक २५/०६/२००८ मध्ये अट क्रमांक २२ व २३ रद्द करण्यांत यावी असे नमुद केले आहे. त्या ऐवजी अट क्रमांक २१ च्या अनुषंगाने अट क्रमांक २२ व २३ मध्ये आवश्यक ते गौण फेरबदल करुन घेण्यास ही सभा मान्यता देत आहे.

तसेच करारनाम्यातील अट क्रमांक ६४ मध्ये कराराचा भंग झाल्यास किंवा वाद निर्माण झाल्यास अधिनियमांच्या संविधानातील आवश्यक त्या बदलाच्या अंतर्गत लवाद मा.विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक असे नमुद केले आहे. त्याऐवजी सदरचे अधिकार मा.आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका, यांना असतील.

तथापि सर्वश्री.गिरवले कैलास रामभाऊ, डागवाले किशोर आसाराम, सतिष मैड व सौ.अर्चना बिज्जा यांचा " कंपनीस केंद्र व राज्य शासनाकडून या योजने अंतर्गत मिळणारे कोणतेही अनुदान देण्यास आमचा विरोध असुन, आमचा विरोध नोंदविण्यांत यावा. " असे दिलेल्या पत्रानुसार विरोध नोंदविण्यांत येत आहे.

उपरोक्त बदलांसह इतिवृत्त कायम करण्यांस मंजुरी देण्यांत येत आहे.

सुचक : मा.श्री.

अनुमोदक :मा.श्री.

ठराव बहुमताने मंजुर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ७ दिनांक : १५-०९-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :** नागापुर / बोल्हेगांव या उपनगरांसाठी स्मशानभुमि / दफनभुमि इत्यादी कामासाठी नागापूर स.नं.१३० / १ ही जागा संपादन करणे महानगरपालिका ठराव नं.७ दि. २८-०७-२००८ अन्वये झालेल्या ठरावानुसार प्रस्ताव निर्णयास्तव सादर.

--*--

**ठराव :** ठरविण्यांत येते की, नागापूर स्मशान भूमी / दफनभुमी साठी जागा उपलब्ध होणे या धोरणांस सर्वोच्च प्राधान्य देण्यांत येत आहे. मात्र जागेबाबतची व्यवस्था करतांना सदर ठिकाणी असलेल्या जागेचा परिसर मोजुन घेणेंत यावा. त्याच्या असलेल्या नोंदी देखील तपासणेंत याव्यात त्यानंतर मालकी हक्क कोणाचा आहे, याची सविस्तर माहिती घेण्यांत यावी. या सर्व तांत्रिक बाजु तपासून सदरच्या स्मशानभूमी / दफनभूमी साठी आवश्यक असणांरी जागा ही खाजगी मालकीची असल्यास सदर जागा संपादन करणें बाबत त्वरीत योग्य ती कार्यवाही करावी. खर्च मंजुर.

नियमानुसार कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.दशरथ शिंदे

अनुमोदक :मा.श्री.संजय लोंढे

ठराव बहुमताने मंजुर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ४ दिनांक : १५-०९-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : अहमदनगर महानगरपालिकेने तयार केलेल्या नागरिकांचा जाहिरनामा यामध्ये विहीत केलेल्या मुदतीत कार्यालयीन कर्तव्ये पार पाडतांना विलंबास प्रतिबंध होणे बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ सादर.

-- * --

ठराव : ऑफिस रिपोर्ट मंजुर. मात्र सभागृहामध्ये झालेल्या व्यापक चर्चेचा विचार करता सन्माननीय सदस्य यांनी सुचित केलेल्या सुचनांचे समावेशासह प्रस्तावित नागरिकांचा सुधारित जाहिरनामा मसुदा मंजुर करण्यांत येत आहे. सदरच्या सुचना खालील प्रमाणे.

१. गुंठेवारी कायद्यानुसार नागरिकांच्या प्रकरणांचा निपटारा करणेंत यावा. त्यात होणांरा विलंब टाळावा. प्रकरणांत मोजणी नकाशा उपलब्ध नसल्यास नगर रचना विभागामार्फत मोजणी / आखणी करावी / तपासावी.

२. बांधकाम परवानगी देण्यांसाठी कायद्याप्रमाणे ६० दिवसांची मुदत आहे. तथापि ही मंजुरी ३० दिवस करणेंत यावी.

३. बांधकाम पुर्णत्वाचा दाखला देण्यांसाठी सुधारित मुदत २१ दिवस ठरविणेंत यावी.

४. आरोग्यदृष्टया बांधकाम ना हरकत प्रमाणपत्र ७ दिवसामध्ये देण्यांत यावे.

अशा सुचनांच्या समावेशासह नागरिकांचा जाहिरनामा मसुद्या तयार करण्यांत यावा. तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार नगर रचना योजना क्र.५ व ६ तयार करण्यासाठी फार मोठा कालावधी उलटुन गेलेला आहे. व आता त्यानंतरही मोठा कालावधी लागणांर आहे. मध्यंतरीच्या काळात या भागात संपुर्ण विकास झालेला आहे. त्यामुळे नगर रचना योजना निरूपयोगी ठरणार आहे. सबब नगर रचना योजना क्र. ५ व ६ रद्य करणेत यावी . त्याप्रमाणे आवश्यक ते शासनास कळवावे. तसेच विकास योजना, अहमदनगर (वाढीव क्षेत्र) तयार करण्याचे काम पुर्ण झालेले असल्याने त्यासाठी निर्माण केलेला विकास योजना विशेष घटक बंद करणेत यावा.

सुचक : मा.श्री.नामदेव पवार.<br>
अनुमोदक : मा.श्री.भगवान फुलसौंदर<br>
ठराव बहुमताने मंजुर.

महापौर,<br>
अहमदनगर महानगरपालिका.